# सुसंवाद

**जानेवारी २०२६**

**चित्पावन आठवले वार्तापत्र**



**२०२६ या नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा**



संपादक
सतीश आठवले



उपसंपादक
श्रीकांत आठवले

# मुखपृष्ठ – काश्मीर मधील हिवाळा

## चित्पावन आठवले फौंडेशन, पुणे


## कार्यकारी मंडळ
अनिल महादेव आठवले, अध्यक्ष
श्रीकांत गोपाळ आठवले, उपाध्यक्ष
सौ. यशश्री सुयोग आठवले, सचिव



खासगी वितरणासाठी

लेखांमधील मते संबंधित लेखकांची आहेत. संपादक मंडळ त्याच्याशी सहमत असेलच असे नाही.



वेबसाईट: www.chittpavan-athavale.com
ई-मेल: susamvad.caf@gmail.com

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. संपादकीय | ४ |
| २. कविता - जय श्रीराम: सौ सुलभा आठवले | ४ |
| ३. वाणी व व्यक्तिमत्व: - डॉ अनघा आठवले | ५ |
| ४. मेडिएशन (मध्यस्थी) - श्री विनायक आठवले | ६ |
| ५. Appeal for Business Directory | ८ |
| ६. किल्ले पन्हाळा - एक महत्वाचा गिरिदुर्ग - श्री श्रीकांत आठवले | ८ |
| ७. श्रवण चा अर्थ - डॉ अनघा आठवले | १३ |
| ८. रूपक कथा – साक्षात्कार - श्री प्रसन्न आठवले | १६ |
| ९. Flight Delay, A travel - Dr. H Ajith Hebbar Atavale | १९ |
| १०. CBRN - A threat to Society - Col Ram Athavale | २१ |
| ११. २०२६ चे कुलसंमेलन | २७ |
| १२. पाकातील पुरी - पाककृती - सौ. उमा आठवले | २७ |
| १३. बल्लाळ सिद्धीविनायक - श्री श्रीविजय आठवले | २८ |
| १४. चित्पावन आठवले वाचनालय - श्री स्वप्नील आठवले | ३० |
| १५. सभासदांची विशेष कामगिरी | ३१ |
| १६. सभासदत्वासाठी आवाहन | ३३ |
| १६. चांगल्या गोष्टी / बातम्या - श्री कुमार आठवले | ३३ |

## संपादकीय

आपल्या सुसंवाद ह्या त्रैमासिकाचा हा नवीन वर्ष 2026 मधील पहिला अंक आपल्या हाती देतांना संपादक मंडळास अत्यंत आनंद होत आहे.

" हे नूतन वर्षआपणास व आपल्या कुटुंबीयांस आनंदाचे व समृद्धीचे जावो ही आपल्या संस्थेतर्फे परमेश्वर चरणी प्रार्थना**.**"

ह्या अंकासाठी कोणताही विशेष असा विषय नाही. पण मागील काही अंकांसाठी काही लेख आले होते जे त्या त्या अंकांच्या विषयानुरूप नव्हते म्हणू तेंव्हा छापले गेले नाही असे सर्वलेख या अंकात समाविष्ट केले आहेत. त्या व्यतिरिक्त इतरही लेख या अंकात असतील.

आतापर्यंत आपण फक्त मराठी भाषेतील लेख किंवा कविता छापत होतो परंतु आपल्या आठवले मंडळीत इतर भाषिक मंडळीही आहेत जे मराठी समजू शकतात पण लिहू शकत नाही. अशाही मंडळींनी लिहिण्यास प्रवृत्त व्हावे म्हणून आपण येथून पुढे इतर भाषेतील लेखही छापण्याचे ठरवले आहे. इतर भाषिक आठवले मंडळी याला योग्य तो प्रतिसाद देतील अशी आशा आहे.

मागेही सांगितल्याप्रमाणे सुसंवाद त्रैमसिकाचा उद्देश आपल्या सदस्यांनी लिहिते व्हावे, त्यांचे अनुभव लोकांना कळावे असा आहे. आम्हास अशा आहे की आपण आमच्या आवाहनास योग्य प्रतिसाद द्याल.

आपण हा अंक वाचाल व आपल्या बर्यावाईट प्रतिक्रिया आमच्या पर्यंत पोचवाल अशी आम्ही आशा करतो. अंक अधिक वाचनीय व्हावा म्हणून काही सूचना असल्यास जरूर पाठवा . धन्यवाद

..........................................

## कविता

**- सौ सुलभा आठवले, ८८८८८ ११८६१**

**जय श्रीराम । जय जय श्रीराम ।।**

निर्विकल्प, निर्विवाद, निर्विकार
निरंजन राम आम्हा आधार ।।
धर्म, अर्थ, मोक्ष आणि काम
चारी पुरुषार्थांचा हा विश्राम ।।१।।

सत्यरूप, मर्यादारूप प्रिय राम
तेजस्वी, कैवल्यरूप संयमी राम ।।
पराक्रमाचे मूर्त रूप जणू राम
करुणाकर, दुष्टमर्दन माझा राम
नरोत्तम, नृपोत्तम, विवेकी राम ।।२।।

दीनांसाठी  दाता हो
भक्तांचा त्राता हो ।।
दांभिकांचा शास्ता हो
दुष्ट खलांचा नियंता हो  ।।३।।

भारतभूमीचा भाग्यविधाता
तुजवीण नाही रक्षणकर्ता
हिंदूंचा होई तू मातापिता,
कर्ता, धर्ता आणि सदा त्राता ।।४।।

सौ सुलभा आठवले,
८८८८८ ११८६१

**श्रीराम जयराम । जय जय राम ।।**

🌹 🌹 🌹

................................................

## वाणी व व्यक्तिमत्व

**डॉ अनघा अनिल आठवले ९०४९१ ४४२२२**


मित्रांनो आपला एक महत्त्वाचा सण संक्रांत अगदी जवळ आला आहे. तिळगूळ घ्या आणि गोड बोला असे आपण म्हणतो. म्हणजे आपली भाषा गोड असावी. आपल्या शास्त्र कारांनी असे म्हणून ठेवले की
सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् , न ब्रूयात् सत्यम् अप्रियम् । प्रियं च नानृतम् ब्रूयात् , एष धर्मः सनातन: ॥ मनुस्मृति 4.138।।
सत्य बोलावे जे प्रिय असेल. (सत्य सांगताना विनम्रता, आदर प्रेम असावे)
जे सत्य आहे पण अप्रिय आहे असे बोलू नये. (सत्य काळजीपूर्वक उघड करावे) जे असत्य आहे आणि प्रिय आहे असे सुद्धा बोलू नये.(खोटे कधीच बोलू नये) हाच सनातन धर्म आहे.
ह्या वरून श्रीमद्भगवद्गीतेतील 18 व्या अध्यायातील शेवटच्या श्लोकाची आठवण झाली.
यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम।।18.78।।
ह्या श्लोकात संजय राजा धृतराष्ट्रांना असे म्हणतात की
जेथे योगेश्वर श्रीभगवानकृष्ण आहेत, जेथे धनुर्धारी अर्जुन आहे तेथे वैभव, विजय, सामर्थ्य आणि धृव नीती आहे असे माझे मत आहे. (म्हणजे कौरव युद्ध हरणार आहेत)
शब्दांची योग्य निवड आणि आपल्या मनात असणारे भाव ह्यामुळे आपल्याला नेमके काय म्हणायचे आहे ते ऐकणाऱ्याला समजते.
परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी असे आपल्या वाणीचे चार भाग आहेत.
चत्वारि वाक् परिमिता पदानि तानि विदुब्राह्मणा ये मनीषिण:। गुहा त्रीणि निहिता नेङ्गयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति।
ऋग्वेद-।1-164-45।।

वाणी चे चार भाग आहेत, जे विद्वान जाणतात. ते म्हणजे परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी. यामधील तीन गुप्त असतात. तर चौथी तुरीय वाचा मनुष्य बोलतो.
आपल्या ओठांपासून स्वरयंत्रापर्यंत व्यंजने आणि स्वर यांच्या उच्चारणाच्या जागा ठरलेल्या आहेत. आपण जे बोलतो, म्हणजे जे दुसरे आपले बोलणे ऐकू शकतात, ती म्हणजे वैखरी. त्याआधीची अवस्था म्हणजे मध्यमा. ज्याला आपण पुटपुटणे किंवा जप करणे असे म्हणू शकतो. त्या आधी ची अवस्था सर्वात महत्त्वाची 'पश्यन्ति' ह्या अवस्थेत आपण शब्दांची जुळवाजुळव करतो. आपल्या मनात कर्ता कर्म क्रियापद यासंबंधीच्या कल्पना स्पष्ट असतात. आधी ग्रहण केलेल्या ज्ञानाचा वापर आपण वाक्यरचना करताना करत असतो. सर्वात महत्त्वाची अवस्था ही 'परा' अवस्था. आपल्याला बोलण्यासाठी ऊर्जा देणारी. आपल्या बोलण्याची सुरवात येथेच होते. बरेचदा अनुभव येतो, पूर्ण घोकंपट्टी करून सुद्धा काही वेळा पट्कन गोष्टी आठवत नाहीत. किंवा आधी ठरवले नसून सुद्धा एखाद्या महत्त्वाच्या मिटिंगमध्ये आपण अत्यंत प्रभावी मुद्दा बोलून जातो. हे सर्व आपल्या आत असलेल्या चैतन्यशक्ती च्या प्रभावामुळेच.
वाणीच्या या चार भागांवर स्वतंत्र लेख लिहावा लागेल.
'वाक्यपदीयम्' ह्या भर्तृहरिं च्या संस्कृत ग्रंथात याचे विस्ताराने वर्णन केले आहे. इंग्रजीत भाषा म्हणजे
Language.
मूळ लॅटिन शब्द Lingua म्हणजे जीभ. जीभ हा बोलण्याचा अवयव म्हणून Language .
आता भाषा शब्द कसा आला ते पाहू.
मूळ धातू भाष् म्हणजे बोलणे, स्पष्ट करून सांगणे.
भाष् या धातु ला अच् प्रत्यय जोडला असता पुल्लिंग भाषः

स्त्रीलिंगी भाषा
नपुसकलिंगी भाषम्
अच् प्रत्ययाचा मुख्य अर्थ 'कर्ता' (करणारा ) असा होतो.
भाष् धातु मधील 'भा' ह्या धातु चा अर्थ चमकणे. (भा+ष्) 'भा 'चा अर्थ भाष् ह्या धातु मध्ये प्रतीत होणे अपेक्षित आहेच.
आता प्रश्न असा आहे की आपल्या वाणीतून काय चमकेल? आपले व्यक्तीमत्व?
म्हणजे असे म्हणता येईल की आपण जे बोलतो, जे विचार व्यक्त करतो, तो आपल्या व्यक्तिमत्त्वाचा भाग असतो. आपले व्यक्तीमत्व आपल्या भाषेतून प्रकट होत असते. थोडक्यात आपले विचार मांडण्यासाठी आपल्याला चौफेर ज्ञान, शब्दसंपत्ती आणि ऊर्जा यांची नितांत गरज असते.
जेव्हा आपले विचार आपल्या भाषेतून स्पष्ट होतात तेव्हा आपोआपच त्याची जबाबदारी आपल्यावर असते.
तेव्हा तिळगूळ घ्या आणि गोड तर बोलाच पण भाषेचा योग्य वापर करून बोला.

इति अनघा

..............................................



**श्रीरंग आठवले**

## मेडिएशन (मध्यस्थी)

**विनायक विष्णु आठवले, पुणे**
**९८२२००२३९५**

दोन व्यक्तींमधील , दोन कुटुंबांमधील किंवा दोन संस्थांमधील वाद कोणीतरी शहाण्या व विचारी माणसाने मध्यस्थी करून मिटवणे ही संकल्पना आपल्याकडे नवीन नाही . परंतु याचे व्यावसायिक रूप मात्र आपल्याकडे अजून फारसे रुजलेले नाही. मध्यस्थ ( मेडिएटर ) जर या विषयातील तज्ञ , अनुभवी व निष्पक्ष असेल तर कोर्टात न जाता अनेक प्रकारच्या वादांमध्ये सर्वमान्य असा तोडगा तो काढू शकतो याची फारशी जाणीव अद्याप आपल्याकडे दिसत नाही. . या लेखाद्वारे मेडिएशन म्हणजे नक्की काय व याचा किती प्रकारे उपयोग होऊ शकतो याची माहिती घेऊया .

**मेडिएशनची व्याख्या**
मेडिएशन ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये एक तटस्थ व निष्पक्ष व्यक्ती ( मेडिएटर ), दोन व्यक्ती अथवा संस्थांमधील मतभेद मिटवून त्यांच्यामध्ये असलेली समस्या सोडवायला मदत करते. मेडिएशन म्हणजे नाईलाजाने स्वीकारलेली तडजोड नसून उभयपक्षी मान्य असा सन्मानजनक तोडगा होय

**मेडिएटरची गुणवत्ता**
* निष्पक्ष व समतोल विचार
* दोन्ही बाजूंचे म्हणणे पूर्ण ऐकून घेऊन, त्यांच्या भावना नीट समजावून घेण्याची क्षमता.
* वाटाघाटींचे कौशल्य व अनुभव
* कायदा व इतर व्यावहारिक बाबीचे उत्तम ज्ञान
* संयम व सकारात्मक दृष्टीकोन

## मेडिएशनचे फायदे

* कोर्टकचेरीसाठी लागणारा प्रचंड अवधी, किचकट कायदेशीर प्रक्रिया व होणारा मनस्ताप वाचू शकतो.
* खटल्यासाठी खर्च होणारी रक्कम मेडिएशनपेक्षा कितीतरी जास्त असू शकते .
* मेडिएटरसमोर दोन्ही पक्ष आपली बाजू, आपल्या भावना व अपेक्षा मोकळेपणाने मांडू शकतात.
* मेडिएशनमध्ये जोपर्यंत दोन्ही बाजूना मान्य होत नाही तोपर्यंत कोणताही एकतर्फी निर्णय लादला जात नाही. कोर्ट किंवा आर्बिट्रेशनमध्ये मात्र एकदा झालेला निर्णय आपल्याला मान्य असो व नसो, दोन्ही बाजूवर बंधनकारक असतो.
* मात्र मेडिएशनमध्ये दोन्ही पक्षांना मान्य असलेल्या समझोता करारावर एकदा साह्य झाल्यावर त्याला कायदेशीर स्वरूप येते. (Legal Status of a decree of Court)
* मेडिएशन हे ऐच्छिक असून ही कोर्टापेक्षा कमी वेळेत पूर्ण होणारी, कमी मनस्ताप देणारी, कमी खर्चिक, तुमच्या भावना व प्रत्यक्ष परिस्थिती दोन्ही समजावून घेणारी आणि मतभेदच नव्हे तर मनभेद मिटवण्यासाठी प्रयत्न करणारी प्रक्रिया आहे.

## कुठे उपयोगी पडते मेडिएशन

* कौटुंबिक कलह व स्थावर - जंगम संपत्तीचे वर्षानुवर्षे किवा पिढ्या न पिढ्या चालणारे वाद.
* घटस्फोट व पोटगी संबंधी वाद
* हॉस्पिटल व रुग्णामधील वाद (Medico - Legal disputes)
* कंपनीचे व्यवस्थापन आणि कामगार युनियनमधील वाद
* बांधकाम व्यावसायिक व ग्राहक (Flat owner) यांच्यामधील वाद
* बॅंकांची कर्ज वसुली
* दोन कंपन्यांमधील करारासंबंधीचे वाद (Breach of Contract)
* कंपन्यांमधील mergers / take overs

## मेडीएशनची प्रक्रिया

जेव्हा दोन व्यक्ती किवा संस्थामध्ये पराकोटीचा वाद असतो तेव्हा दोन्ही बाजू एकमेकांशी मोकळेपणाने बोलायला पण तयार नसतात. प्रत्येक वादामध्ये दोन्ही बाजूच्या तीव्र भावना आणि इगो यामुळे सरळ संवाद होऊ शकत नाही . वर्षानुवर्षे वाद सुरूच राहिल्याने यात आपले नुकसान होत आहे हे पण लक्षात येत नाही. मध्यस्थ ( मेडीएटर ) सुरवातीला दोन्ही बाजूशी अनेक वेळा स्वतंत्र चर्चा करून त्यातील भावना आणि इगो दूर करून नक्की समस्या काय आहे यावर लक्ष केंद्रित करतो. ही समस्या कायदेशीररित्या सोडवता येईल का, नसेल तर दोन्ही बाजूना मान्य होईल असा व्यावहारीक तोडगा काढता येईल का याचा विचार करतो.
दोन्ही बाजूची मागणी अवास्तव असली तर तो वस्तुस्थितीची कल्पना देतो आणि वादग्रस्त मुद्द्यात प्रत्येकाच्या bottom line of acceptance ची माहिती करून घेतो. तोडगा दृष्टीपथात आला की दोन्ही बाजूना समोरासमोर बसवून केवळ वाद चालू राहिल्याने दोघांचे किती नुकसान होते आहे हे समजावून सांगतो. अखेर दोघाना मान्य होईल असा तोडगा काढला जातो. मेडीएशनमुले कोर्टाचा वेळ व फी वाचते. परस्परसंबंध सुधारतात आणि win – win परिस्थिती निर्माण होण्यास मदत मिळते. परदेशात अनेक वाद कोर्टात आणण्याऐवजी मेडीएशन द्वारे सोडवण्याची पद्धत आहे. त्यासाठी उत्तम गुणवत्तेचे मेडीएटर उपलब्ध आहेत. दोन राष्ट्रांमधला वाद मेडीएशन द्वारे सोडवल्याची अनेक उदाहरणे आहेत. आपल्याकडे याचा एवढा अजून प्रसार नसला तरी सरकारने जुलै २०२३ मधे " मेडीएशन

बिल २३ पास " केले आहे. मेडीएशनद्वारे सेटल केलेले निकाल कोर्टामध्ये स्वीकारले जाऊ लागले आहेत.
अजून काही काळातच हा पर्याय अधिकाधिक स्वीकारला जाईल, कोर्टाच्या डोक्यावर असलेला भार हलका करायला याची निश्चित मदत होईल .
विनायक विष्णु आठवले, पुणे
९८२२००२३९५

……………………………………………

## Appeal for creating Business Directory

Many members of our Athavale community are likely to have their own businesses or industries. Our foundation aims to create a directory of all such entrepreneurs and business owners and publish it on our website so that others can access their information and contact them for their requirements. This can also give a boost to the existing businesses. We are providing a **Google Form** link below. Those who have a business or industry should click on the link to open the form. Please fill out the form online and submit it by clicking on the submit button at the bottom. The information will be compiled in a tabulated format with us. After sufficient information is collected, it will be published in a booklet and on the website. Please cooperate.
https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSdA_Kwk-je_5lcgbMLFHxvwlJh1ymgsDNjwiqP2QnlPloFbdQ/viewform?usp=header

……………………………………………

## किल्ले पन्हाळा – एक महत्वाचा गिरीदुर्ग

**श्रीकांत आठवले**
**९८२२६ ०१८०५**

**किल्ले पन्हाळा - एक महत्वाचा गिरीदुर्ग**
शिवाजी महाराजांच्या राजकारणात किल्ल्यांची लष्करी संरक्षण; स्वराज्य विस्ताराचे केंद्र; प्रशासन, लष्करी आणि आर्थिक व्यवस्थापनाची ठिकाणे; नौदलाचे आधारस्थान तसेच स्वराज्याची राजधानी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील ओळख निर्माण करण्यात मोलाची भूमिका होती. गिरीदुर्ग किंवा गडकिल्ले हे केवळ तटबंदीचे ठिकाण नव्हते तर ते स्वराज्याच्या स्थापनेसाठी, विकासासाठी आणि रक्षणासाठी अत्यावश्यक होते. हे किल्ले मराठेशाहीच्या जाज्वल्य इतिहासाची आणि पराक्रमाची साक्ष देता.आजही ते मोठ्या दिमाखात उभे आहेत.

शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचे प्रामुख्याने तीन प्रकार आहेत - डोंगरी किल्ले (उदा. रायगड,राजगड), भुईकोट किल्ले (जमीनीवर सपाट जागी किंवा कमी उंचीवर बांधलेले) आणि सागरी किंवा जलदुर्ग (उदा. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग), असे दोन किंवा तीन प्रकार आढळतात. हे किल्ले स्वराज्याचा कणा होते.

कौटिल्य लिहितो, 'भुईकोट किल्ल्यापेक्षा पाणकोट किल्ला चांगला व पाणकोट किल्ल्यापेक्षा डोंगरी किल्ला चांगला. महाराष्ट्रात गिरीदुर्गांची संख्या फार मोठी होती व आहे. किल्ले पन्हाळा - हा त्यापैकीच एक महत्वाचा गिरीदुर्ग. पन्हाळा किल्ला हा एका महत्त्वाच्या व्यापारी मार्गावर वसलेला आहे, जो महामार्ग महाराष्ट्रातील बिजापूरपासून अरबी समुद्राच्या किनारपट्ट्यापर्यंत जातो.



**इतिहास:**
पन्हाळ्याला साधारण १,२०० वर्षांचा इतिहास आहे. पन्हाळा हा महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यात असलेला एक ऐतिहासिक किल्ला आहे, जो सह्याद्रीच्या डोंगररांगेत स्थित आहे. हा गड 'दख्खनचा दरवाजा' म्हणून ओळखला जात असे.

त्यातील स्थापत्यशास्त्रातील बारकावे आणि ऐतिहासिक महत्त्व आजही अनेक पर्यटकांना भूतकाळात घेऊन जातात. हा किल्ला मराठ्यांच्या शौर्याचा जिवंत इतिहास आहे.हा किल्ला कोकण व घाटमाथा जोडणारा महत्त्वाचा दुवा होता. या किल्ल्याला समृद्ध इतिहास असून तो शिलाहार काळापासून अस्तित्वात आहे. हा किल्ला पूर्वी ब्रह्मगिरी नावाने ओळखला जायचा, नंतर तो नाग जमातीतील लोकांकडे होता. तेव्हा याचे नाव पन्नग्नालय होते व ते पाली भाषेतील आहे. त्यानंतर प्रणालक/पद्मनाल शहानबी-दुर्ग व नंतर शिवाजी महाराज्यांच्या काळात तो पनाला/पन्हाळा या नावाने ओळखला जाऊ लागला. राजा भोज (दुसरा) याच्या काळात, म्हणजे ११७८ - १२०९ या शिलाहार काळात पन्हाळा किल्ला बांधला गेला असावा, असे सातारा येथे सापडलेल्या ताम्रपटांवरून दिसून येते. तसेच राजा भोजाने ११९१ ते ११९२ दरम्यान पन्हाळा येथे दरबार भरवला होता.

प्रतापगडावर अफझलखानाच्या मृत्युनंतर अवघ्या १८ दिवसांनी म्हणजे शिवाजी महाराजांनी १६५९ मध्ये पन्हाळा किल्ला जिंकला. १६६० ला किल्ल्यास सिद्दी जौहरचा वेढा पडला. छत्रपती शिवाजी महाराज सिद्दी जौहरच्या वेढ्यात अडकून पडले होते. चार महिन्यांच्या वेढ्यानंतर किल्ल्यातील साहित्य संपल्यामुळे शिवाजी महाराजांना तिथून निघण्याचा निर्णय घ्यावा लागला. शेवटी, आदिलशहाने पन्हाळा किल्ला ताब्यात घेतला. नंतर १६७३ मध्ये परत एकदा कोंडाजी फर्जंद याने अवघ्या ६० योद्ध्यांसह पन्हाळा ताब्यात घेतला आणि महाराजांना परत केला. शिवाजी महाराजांच्या उत्कर्ष काळात पन्हाळ्यावर २०,००० सैनिक व १५,००० घोडे यांची सोय होऊ शकत होती.

पन्हाळा किल्ला हा केवळ ऐतिहासिक ठेवा नाहीतर महाराष्ट्राच्या गौरवशाली भूतकाळात नेणारी ती एक अद्‌भुत सफर आहे. त्याची भव्य प्रवेशद्वारे पार करताना
इतिहासाची साक्ष जाणवते. किल्ल्याची भक्कम तटबंदी आणि प्राचीन वास्तुकला
पाहताना भूतकाळ डोळ्यांसमोर उभा राहतो. येथून दिसणारे सह्याद्रीचे विस्तीर्ण दृश्य मनाला मोहून टाकते. इथे इतिहास आणि निसर्गाचा अनोखा मिलाफ अनुभवता येतो. इ.स. १७१० मध्ये पन्हाळा कोल्हापूरची राजधानी बनला आणि इ.स. १८४४ मध्ये तो ब्रिटिशांच्या ताब्यात गेला.

**भौगोलिक स्थान व वास्तुरचना:**
पन्हाळा किल्ला हा दख्खनमधील सर्वांत मोठ्या किल्ल्यांपैकी एक आहे. हा किल्ला तब्बल १४ किलोमीटर परिसरात विस्तारलेला आहे. त्याच्या मजबूत तटबंदी, गुप्त वाटा आणि लढाईसाठी अनुकूल रचना मध्ययुगीन स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना दर्शवतात. हा किल्ला केवळ संरक्षणासाठी नव्हता, तर एक स्वतंत्र वसाहत म्हणून विकसित झाला होता. लांबच लांब वेढ्यांना तोंड देण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा येथे उपलब्ध होत्या. पन्हाळगड हा कोल्हापूर शहराच्या वायव्येस २१ कि. मी. अंतरावर असून हे ठिकाण उत्तर अक्षांश १६.४८° व पूर्व रेखांश ७४.८° यावर वसलेले आहे.
**छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या ह्या किल्ल्याला जागतिक**

**वारसा स्थळ म्हणून युनेस्कोचे मानांकन मिळाले आहे.**

कोल्हापूर पासून जवळ असलेल्या या भव्य किल्ल्याचा विस्तार दूरवर पसरलेला आहे. इथल्या प्रचंड तटबंदी, प्राचीन दरवाजे आणि गूढ बोगदे शौर्याच्या आणि लढायांच्या कथा सांगतात. इतिहासाच्या पाऊलखुणा शोधणाऱ्यांसाठी हे ठिकाण एक अनमोल ठेवा आहे. याची कोल्हापूर पासूनची उंची ७०० फूट असून, पन्हाळाच्या पायथ्यापासूनची उंची २७५ फूट आहे. या गडाचा घेर ४२ मैलाचा आहे. १४ कि.मी. च्या परिसरात पसरलेल्या या गडाला ११० माच्या आहेत व गडाची तटबंदी ७ कि.मी. लांबीची आहे.
किल्ल्याच्या सुरक्षेसाठी एकूण ३५ बुरुज बांधले गेले आहेत. हे बुरुज काटेकोर आकारात असून त्यांच्यावर तोफांची सोय केली आहे. यातील काही बुरुजांची नावेही खास आहेत, जसे की सात बाराव्हाणीचा बुरुज, हनुमंताचा बुरुज, कोठी बुरुज इ. या बुरुजांवरून शत्रूंच्या हालचालींवर लक्ष ठेवणे सोपे होते. अनेक भुयारी मार्ग असलेल्या या गडाचे बांधकाम विजापुरी पद्धतीचे असून मोरांची शिल्पे येथे जशी दिसतात तशीच भोज राजाच्या काळातील कमळाची शिल्पेही दिसून येतात.




सह्याद्रीच्या कडेखांद्यावर असलेला हा गड दख्खन पठारावरील सर्वात मोठा गड आहे. गडाच्या तटबंदीची बांधणी व रचना काही ठिकाणी नैसर्गिक तर काही ठिकाणी जांभा खडक फोडून ३२ फूटापर्यंत तयार केली आहे. काही ठिकाणी तो १५ ते ३० फूट उंचीची दगडानी बांधलेली तटबंदी आहे. तटाची रुंदी सर्वसाधारणपणे ५ फूट आहे, पण दरवाजे व माऱ्याच्या टापूत येणारा विभाग या ठिकाणी ती १५ फूट रुंदीची ठेवण्यात आली आहे. अशा ठिकाणी आत एक व बाहेर एक असे दुहेरी तट आहेत. पन्हाळगडची तटबंदी आणि बुरुज ही किल्ल्याची एक प्रमुख आकर्षणे आहेत.

रोमहर्षक रचनांपैकी एक म्हणजे अंधार बावडी. ही तीन मजली भूमिगत विहीर आहे. शत्रूच्या वेढ्यातही गडावर पाण्याचा पुरवठा सुरळीत राहावा म्हणून ती बांधली गेली. सर्वात तळाला खोल पाण्याची विहीर आहे, तर मधला मजला हा चांगला ऐसपैस आहे. त्यातून तटाबाहेर जाण्यासाठी खिडकीवजा चोर दरवाजा दिसतो. अजून एक महत्त्वाची वास्तू म्हणजे सज्जा कोठी. येथून समोरचा निसर्गरम्य नजारा पाहता येतो. शिवाजी महाराज येथे विचारमंथन करीत असल्याची मान्यता आहे. पन्हाळगडावर प्रवेश करण्यासाठी चार दरवाजे आहेत. प्रत्येक दरवाजाचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. ज्या दरवाजाने वाहने गडावर प्रवेश करतात त्या दरवाजाला 'चोर दरवाजा' म्हणतात. या दरवाजाने वैशिष्ट्य म्हणजे शत्रुला गडावर प्रवेश करता येऊ नये, याची खबरदारी घेऊन एकामागे एक असे चार दरवाजे बांधण्यात आले होते. परंतु ब्रिटीशानी तोडफोड केल्याने आता त्याचे फक्त अवशेषच उरले आहेत. येथेच "शिवा काशीद' यांचा पुतळा आहे. कोकणी दरवाजा म्हणून प्रचलित असणारा आणि गडाच्या पश्चिमेस आजही सुस्थितीत ताठ मानेने उभा असणारा दरवाजा म्हणजे 'तीन दरवाजा'. या ठिकाणी एकापाठोपाठ एक असे तीन दरवाजे आहेत. या दरवाजाचे वैशिष्ट्य म्हणजे इ.स 1673 मध्ये जेव्हा कोंडाजी फर्जंद यांनी पन्हाळगड जिंकला, तेव्हा याच तीन दरवाजाच्या मधल्या चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचे सुवर्णपुष्प उधळून स्वागत करण्यात आले होते. या दोन दरवाजांव्यतिरिक्त गडावर वाघ दरवाजा, चोर दरवाजा, राजदिंडी दरवाजा आहे. यापैकी चोर आणि राजदिंडी दरवाजा हा आपत्कालीन दरवाजा म्हणून प्रसिद्ध आहे. राजदिंडी - ही दुर्गम वाट गडाखाली उतरते. याच वाटेचा उपयोग करून शिवाजी महाराज सिद्दी

जौहरचा वेढ्यातून निसटले. हीच विशाळगडावर जाणारी एकमेव वाट आहे.

डोंगरी किल्ला बांधताना सर्वात महत्वपूर्ण गोष्ट असते ती पाण्याची. पाण्याची सोय ज्या ठिकाणी असेल तेथेच डोंगरी किल्ला हा उभारला जातो. पन्हाळगडाच्या भागात पाण्याच्या सोयी चांगल्या आहेत. कारण या गडाच्या उत्तरेस वारणा, दक्षिणेस कासारी व भोगावती या नद्यांनी हा भाग वेढलेला आहे. त्याचप्रमाणे पन्हाळगडावर 'सादोबा तलाव' व 'सोमाला तलाव' हे अदिलशहाच्या काळात बांधण्यात आले होते. तसेच पन्हाळयावर अनेक विहिरी आहेत यात उल्लेखनीय विहीरी 'कर्पुरबाव' (अश्वलायन तीर्थ), 'अंधारबाव'. श्री सभाजी मंदीरातील विहीर इत्यादी आहेत. त्यामुळे पन्हाळगडावर पाण्याची कमतरता नसे व आजही भासत नाही. राजवाडा- हा ताराबाईचा वाडा होय व यातील देवघर बघण्यासारखे आहे. आज यात नगरपालिका कार्यालय, पन्हाळा हायस्कूल व मिलिटरी बॉइज हॉस्टेल आहे. सज्जाकोठी- राजवाड्यावरून पुढे गेल्यावर ही कोठीवजा इमारत दिसते. याच इमारतीस संभाजी राजांना शिवाजी महाराजांनी या प्रांताचा कारभार पाहण्यास ठेवले होते. शिवरायांची गुप्त खलबते येथेच चालत. इतिहासकारांच्या मते सज्जाकोठी ही फक्त लष्करी उपयोगासाठी नव्हे तर निवांत क्षण घालवण्यासाठी, महत्त्वाच्या पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठी आणि गडाच्या परिसरावर लक्ष ठेवण्यासाठी वापरली जात असे. याशिवाय, उंचावर असल्याने ती हवेशीर व निसर्गरम्य ठिकाण ठरते. या सज्जेतून पन्हाळा किल्ल्याच्या परिसरातील विस्तीर्ण प्रदेश सहज पाहता येतो. लांबवर पसरलेल्या हिरवीगार टेकड्या, खोरं आणि गडाची भव्य तटबंदी - हे दृश्य त्या काळातील राजांना किंवा सरदारांना गुप्त निरीक्षणासाठी तसेच निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्यासाठी उपयुक्त ठरले असावे.

अंबरखाना- हा पूर्वीचा बाले किल्ला. त्याच्या सभोवती खंदक आहे. येथेच गंगा, यमुना आणि सरस्वती अशी तीन धान्य कोठारे आहेत. यात वरी, नागली आणि भात असे सुमारे २५ हजार खंडी धान्य मावत असे. याशिवाय सरकारी कचेऱ्या, दारुगोळ्याची कोठारे आणि एक टाकसाळ होती.
बाजीप्रभूंचा पुतळा- एस टी थांब्यावरून थोडे खाली आल्यावर एका ऐसपैस चौकात वीररत्न बाजीप्रभू देशपांडे यांचा आवेशपूर्ण पुतळा आहे. मंदिरे - पन्हाळगडावर अनेक मंदिरे आहेत. यापैकी महालक्ष्मी मंदिर हे सर्वात प्रसिद्ध मंदिर आहे. हे मंदिर शिलाहार राजवटीच्या काळात बांधले गेले असून त्याच्या वास्तुकलेवर दक्षिण भारतीय शैलीचा प्रभाव दिसतो. किल्ल्यावर इतर अनेक मंदिरे आहेत

**महत्वाचा संदर्भ:**

पन्हाळगडाचा वेढा - इ.स. १६६०
पन्हाळा गडाचा वेढा ही इ.स. १६६० मधील एक ऐतिहासिक घटना आहे. अफझल खानच्या मृत्युनंतर अवघ्या १८ दिवसांनी, २८ नोव्हेंबर १६५९ रोजी शिवाजीने पन्हाळा जिंकला. विजापूर सल्तनत चे दोन प्रमुख सेनापती, अफझल खान आणि रुस्तम जमान, जे दोघेही शिवाजीला पकडण्याच्या प्रयत्नात अयशस्वी झाले होते, त्यांच्या प्रयत्नांनंतरही त्यांना विजय मिळाला नाही. विजापूरला पर्यायांची कमतरता भासत असल्याने आणि शिवाजीच्या वाढत्या प्रभावाचा सामना करावा लागत असल्याने ही मोहीम पूर्ण करण्याची जबाबदारी सिद्दी जौहरवर आली. मे १६६० मध्ये सिद्दी जोहरच्या नेतृत्वाखाली विजापूरच्या सैन्याने पन्हाळा किल्ल्याला वेढा घातला. हा वेढा सुमारे चार महिने चालला आणि किल्ल्यात जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाली. पन्हाळ्याच्या वेढ्यातून सुटका मिळवणे हे शिवाजी महाराजांच्या बुद्धिमत्तेचे आणि धैर्याचे प्रतीक मानले जाते. या वेढ्याच्या प्रसंगातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या धैर्यवान मावळ्यांचे शौर्य आणि निष्ठा दिसून येते.

पन्हाळ्याचा वेढा दोन्ही बाजूंसाठी सहनशक्तीची परीक्षा बनला, शिवाजीचे सैनिक त्यांच्या किल्ल्याचे रक्षण करण्यासाठी शौर्याने

लढत होते. नेताजी पालकर यांच्या अथक हल्ल्यांना न जुमानता, सिदी जौहर पन्हाळा जिंकण्याचा दृढनिश्चयी राहिला. त्याने आपल्या सैन्याला किल्ल्यावर पूर्ण हल्ला करण्याचे आदेश दिले. शिवाजी आणि त्याचे लोक शौर्याने लढले परंतु त्यांची संख्या कमी होती. नेताजींनी महाराजांना इजा होण्यापासून वाचवण्यासाठी जौहरच्या सैन्यावर रात्रीच्या वेळी हल्ले केले. विजापूरशी युद्ध अजून संपलेले नव्हते आणि शिवाजी महाराज आपल्या राज्याची सुरक्षितता आणि समृद्धी सुनिश्चित करण्यासाठी काहीही करण्यास तयार होते. पन्हाळ्याची लढाई ही शिवाजीच्या स्वातंत्र्यलढ्याच्या दीर्घ आणि गुंतागुंतीच्या इतिहासातील फक्त एक अध्याय होती. सिद्दी जौहरने सुरू केलेल्या वेढ्यामध्ये शिवाजीच्या सुटकेचे सर्व मार्ग बंद करण्यात आले होते.

.

पावनखिंडीतले युद्ध - १२/१३ जुलै १६६०

अशाप्रकारे शिवाजी महाराज साधारणतः चार महिने पन्हाळ्यावर अडकून पडले होते. जुलै महिन्यातला जोरदार पाऊस सुरू झाल्यामुळे आता वेढ्यातून बाहेर पडण्यास पोषक स्थिती निर्माण झाली होती. सुरुवातीला महाराजांनी आपण स्वतः स्वाधीन होत आहोत असं नाटक आपल्या वकिलांकरवी वठवलं. मात्र १२ जुलै १६६० रोजी भरपावसाळ्यात रात्री किल्ला सोडण्याचा निर्णय घेतला. त्यांनी पन्हाळ्याच्या पश्चिमेस साधारणतः ६० किमी अंतरावर असलेल्या खेळणा म्हणजेच विशाळगडाकडे जाण्याचा निर्णय घेतला. धो धो कोसळणारा पाऊस, त्यात आपल्या शरण येण्याच्या नाटकामुळे वेढ्यात तयार झालेली ढिलाई याचा त्यांना फायदा निश्चितपणे उठवता आला. पन्हाळ्याच्या पश्चिमेस असणाऱ्या एका वाटेने ते ६०० मावळ्यांसह बाहेर पडले. तरीही या मोहिमेची चाहूल सिद्दी जौहरला लागलीच. सिद्दी जौहरने त्यांना थांबवण्यासाठी मोठं दळ पाठवलं. सुरुवातीला त्यांनी शिवा काशीद या महाराजांसारखे दिसणाऱ्या व्यक्तीस पकडले. मात्र हे खरे महाराज नाहीत हे लक्षात आल्यावर त्यांनी त्वेषाने पाठलाग सुरू केला. शिवाजी महाराजांनी विशाळगडावर जाऊ नये यासाठी वाटेत शृंगारपूरचे सुर्वे नेमले होते. हे अडथळे तसेच एकीकडे कोसळणारी अस्मानी आणि पाठलाग करणारी सुलतानी असं संकट पार करत त्यांना विशाळगडावर पोहोचायचं होतं. अखेर सिद्दीच्या सैन्याला रोखण्यासाठी एके ठिकाणी त्यांना थांबावंच लागलं. पांढरपाणी नावाच्या जागेवरील खिंडीत बाजी प्रभू देशपांडे यांचे हिरडस मावळातील आणि इतर सैन्य सिद्दी जौहरच्या सैन्याला रोखण्यासाठी थांबले आणि तिकडे शिवाजी महाराज ३०० मावळ्यांसह विशाळगडाच्या दिशेने गेले.

पावनखिंडीतील लढाई ही मराठी इतिहासातील एक महत्वाची लढाई आहे. ही लढाई १३ जुलै १६६० रोजी विशाळगडानजीक पावनखिंड अथवा घोडखिंड येथे झाली. पन्हाळ्याच्या वेढ्यातून निसटून छत्रपती शिवाजी महाराज विशाळगडाकडे कूच करत होते. आदिलशाही सेनेला त्यांचा सुगावा लागला व शिवाजी महाराजांच्या मागे आदिलशाही सेनेचा पाठलाग चालू झाला. आदिलशहाची फौज १० हजारांची होती, तर महाराजांसोबत फक्त ६०० मावळे होते. जेव्हा महाराज व त्यांचे साथीदार घोडखिंडीत पोहोचले त्यावेळेस बाजीप्रभू देशपांडे यांनी महाराजांना विनंतीवजा आदेश दिला की, शिवाजी महाराजांनी पुढे गडावर जावे व जोवर महाराज गडावर पोहचत नाहीत तोवर बाजी ही खिंड लढवतील व शत्रूला तिथे रोखून धरतील.

खिंडीत मसूदचे सैनिक पोहोचल्यावर त्यांना मावळ्यांच्या आडव्या रांगेचा सामना करावा लागला. मावळ्यांच्या मागील रांगांनी तसेच आजुबाजूच्या कड्यांवर चढून दगड गोट्यांची बरसात चालू केली. अतिशय चिंचोळ्या वाटेमुळे केवळ एक दोनच सैनिक मराठ्यांच्या रांगेपर्यंत पोहोचत व मारले जात. अशा प्रकारे मराठ्यांनी मसूदच्या सैनिकांची कत्तल आरंभली.

बाजीप्रभू, फुलाजी, संभाजी जाधव, बांदल यांनी आपापल्या कमानीतून मसूदच्या सैनिकांना ठार केले. मसूदने बंदुकधाऱ्यांना कड्यावर चढून बाजीप्रभूंवर गोळीबार करण्याचा आदेश दिला.

बाजींवर गोळ्या झाडण्यात आल्या. बाजीप्रभू जखमी झाले तरी त्यांनी सैनिकांना कोणत्याही परिस्थितीत आपली जागा सोडू नका, असे बजावले. काही वेळातच शिवाजी महाराज विशाळगडावर पोहोचले. त्यांनी तोफांचा गजर दिला. इकडे घोडखिंडीत बाजीप्रभूंनी तोफांचा गजर ऐकल्यानंतर कर्तव्यपूर्तीच्या समाधानाने आपला जीव सोडला. बाजीप्रभू व इतर मराठा सैनिकांच्या बलिदानामुळे ही जागा पावन झाली म्हणून घोडखिंडीचे नाव पावनखिंड असे पडले.
या लढाईत बाजी प्रभू देशपांडे यांनी आपल्या असीम शौर्याचे दर्शन घडवलं. बाजी प्रभू आणि त्यांच्या साथीदारांनी खिंड अडवून धरली. त्यामुळे महाराजांना विशाळगडावर सुरक्षित पोहोचण्यास मदत झाली.
या लढाईत बाजी प्रभू देशपांडे, त्यांचे भाऊ फुलाजी प्रभू देशपांडे आणि इतर अनेक मावळे वीरगती प्राप्त झाले. त्यांची विशाळगडावर समाधी बांधण्यात आली.

असा हा दख्खनमधील सर्वांत मोठ्या किल्ल्यांपैकी एक म्हणजे किल्ले पन्हाळगड, एक बुलंद गिरिदुर्ग. इथल्या प्रचंड तटबंदी, प्राचीन दरवाजे आणि गूढ बोगदे शौर्याच्या आणि लढायांच्या कथा सांगतात. छत्रपती शिवाजी महाराजांसाठी हा किल्ला महत्त्वाचा लष्करी तळ ठरला. छत्रपती शिवरायांचे सरदार, मावळे हे जीवाला जीव देणारे होते. पन्हाळ्याच्या इतिहासात शिवछत्रपतींबरोबर त्यांची नावे सुवर्णाक्षरात कोरली गेली आहेत. मराठा लढवय्यांचा तेजस्वी इतिहास शतकानुशतके पन्हाळा कथन करत राहील. इतिहासाच्या पाऊलखुणा शोधणाऱ्यांसाठी हे ठिकाण एक अनमोल ठेवा आहे.

श्रीकांत आठवले
९८२२६ ०१८०५

.......................................................

## 'श्रवण' चा अर्थ

**डॉ अनघा अनिल आठवले ९०४९१ ४४२२२**

श्रीमद्भगवद्गीतेत तीन महत्त्वाचे योग सांगितले आहेत. कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तीयोग. सगुण साकार रूपाची भक्ती करता करता आपल्याला भगवंताचे निर्गुण निराकार रूप समजून घ्यायचे आहे. त्यासाठी ज्ञान प्राप्ती हाच एक मार्ग. ज्ञान प्राप्ती कशी करायची ह्याचे मार्गदर्शन आपल्याला वेदांतात वाचता येते. **श्रवण, मनन आणि निदिध्यासन** अशी ती त्रिसूत्री. सदानंद योगेंद्र सरस्वती यांनी वेदान्तसार या ग्रंथात श्रवण, मनन आणि निदिध्यासन हे ज्ञानमार्गाचे भाग आहेत असे स्पष्ट केले आहे. या तिन्हीच्या माध्यमातून ब्रह्मसाक्षात्कार शक्य होतो. ऋषी याज्ञवल्क्य यांनी त्यांच्या पत्नी मैत्रेयीला श्रवण , मनन आणि निदिध्यासन या साधना पद्धतीची वाच्यता केली आहे.

**श्रवणादिभिरुद्दीप्तज्ञानाग्निपरितापिताः।**
**जीवस्सर्वमलान्मुक्तस्स्वर्णवद्द्योतते स्वयम्**
**।।आत्मबोध 66।।**

आदि शंकराचार्य असे म्हणतात की साधक जेव्हा श्रवण (गुरु कडून ऐकणे ), मनन (तर्क-विचार द्वारे दृढ़ता )आणि निदिध्यासन (गहन विचार ) ह्या साधनां द्वारे आत्मज्ञान चा अग्नी प्रज्वलित करतात, तेव्हा ते स्वयं, सोन्यासारखे झळाळतात.
ऋषींनी हि त्रिसूत्री अतिशय विचारपूर्वक रचली आहे. हि तीन सूत्रे आपल्या आधुनिक काळातील अध्ययन पद्धतीशी सुसंगत आहेत का? या प्रश्नाचा उहापोह खालील लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे. हे लिहीताना संशोधकाची अभ्यास क्रिया डोळ्यासमोर ठेवली आहे.

मध्यंतरी 'दण्डक्रम पारायण' संबंधी बातमी वाचनात आली होती. इथे विशेष नमूद करावेसे वाटते की त्रिसूत्री मध्ये पाठांतराचा उल्लेख केलेला नाही.

**'अर्थेविण पाठांतर कासया करावें । व्यर्थचि मरावे घोकूनियां ॥'**

असे तुकाराम महाराजांनी म्हणून ठेवले आहे. सध्याच्या काळातील शिक्षण पद्धती बघता केवळ पाठांतर करून परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा पर्याय निवड असेच काहीसे स्वरूप दिसून येते. म्हणूनच वैदिक काळातील अध्ययन पद्धत जाणून घ्यायला हवी.
वेदान्तात ब्रह्मतत्वाला जाणून घेणे हेच ज्ञानप्राप्तीचे लक्ष्य. ब्रह्मतत्वाची तुलना इतर कोणत्याही ज्ञानाशी होऊ शकत नाही, एवढाच काय तो आधुनिक शास्त्रांमध्ये फरक. कर्मयोगी ने आपले काम मनापासून करायचे आहे, म्हणजे ते योग्य प्रकारे होण्यासाठी अभ्यास आवश्यकच. म्हणून उपनिषदात सांगितलेल्या ज्ञानप्राप्तीच्या मार्गाचे आपण अनुकरण करू शकतो का ते शोधण्याचा हा छोटासा प्रयत्न. श्रवण म्हणजे ऐकणे हा झाला ढोबळ अर्थ. (आपण वाचणे असे काळानुरूप म्हणायला हरकत नाही). आपल्या मुखातून बाहेर पडलेले ध्वनी समजून घेऊन, त्याला  प्रतिसाद देण्याची कृती ज्यामुळे निर्माण होते, ते म्हणजे श्रवण कौशल्य.

भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणे  उपनिषदातील रहस्य जाणून घेण्यासाठी गुरुंकडून शिष्यांना मिळालेले उपदेश म्हणजे श्रवण.
समर्थांनी श्रवणाचे अतिशय मार्मिक वर्णन केले आहे.

**श्रोते पुसती कोण ग्रंथ। काय बोलिलें जी येथ। श्रवण केलियानें प्राप्त । काय आहे ॥ 1.1.1॥**
**आतां श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ । तुटे संशयाचें मूळ । येकसरां ॥ 1.1.28॥**

श्रवणाने तत्काळ क्रिया पालटते आणि संशयाची मुळे नष्ट होतात.
रोज व्यायाम केला पाहिजे हे फक्त ऐकून सोडून न देता तात्काळ त्याची अमलबजावणी करायची म्हणजे 'श्रवण'.
अर्थबोध न होता केलेले श्रवण समर्थांना मान्य नाही. अर्थ न जाणून घेता जे एखाद्या ग्रंथाचे नुसते श्रवण करतात, त्यांना समर्थांनी 'मनुष्यवेशधारी पाषाण' म्हटले आहे. समर्थ दासबोधात सांगतात की,

**अर्थांतर पाहिल्यावीण। उगेंचि करी जो श्रवण।**
**तो श्रोता नव्हे पाषाण। मनुष्यवेषें॥ 8. 6.7।।**

थोडक्यात अभ्यासपूर्ण श्रवण करून आपण आपल्या विचारात आणि कृती मध्ये बदल घडवून आणणे अत्यावश्यक. श्रवणाची हिच फलश्रुती अपेक्षित आहे. श्रवणामुळे जर आपल्या वर्तनात अमूलाग्र बदल घडणार असेल तर आपण केलेले श्रवण तितकेच दर्जेदार असले पाहिजे.

**तरी अवधान एकलें दीजे । मग सर्वसुखासि पात्र होईजे । हें प्रतिज्ञोत्तर माझें । उघड ऐका ॥ ज्ञानेश्वरी 9.1॥**

श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, – अहो श्रोते हो! तुम्ही एकवेळ श्रवणाकडे लक्ष द्या, म्हणजे मग सर्व सुखाला पात्र व्हाल. हे माझे उघड प्रतिज्ञेचे बोलणे ऐका.

श्रवण प्रक्रियेचे विविध टप्पे, विविध प्रकार, विविध पैलू
म्हणजे षड्लिड्ग. लिंग म्हणजे ओळख. सहा बिंदूंच्या साह्याने श्रवण प्रकाराचे वर्णन केलेले दिसते.  त्या संदर्भातील मंत्र पुढीलप्रमाणे

**श्रवणं नाम षड्विध-लिङ्गैः अशेष-वेदान्तानाम् अद्वितीय-वस्तुनि तात्पर्य-अवधारणम्।।वेदांत सार। 182।।**

सहा प्रकार च्या लिङ्गां (लक्षणे किंवा चिह्ने ) द्वारे सम्पूर्ण वेदान्ताचे तात्पर्य (लक्ष्य) अद्वितीय वस्तु (ब्रह्म) आहे. अशी धारणा असणे म्हणजे 'श्रवण'. वर उल्लेख केलेली सहा लक्षणे पुढीलप्रमाणे
1.उपक्रम-उपसंहार, 2. अभ्यास, 3. अपूर्वता, 4. फल, 5. अर्थवाद, 6. उपपत्ति
ह्या सहा पैलूंची आपण तोंड ओळख करून घेऊ.

**उपक्रम - उपसंहार** (एकवाक्यता)
उप' (जवळ) आणि 'क्रम' (मांडणी/सुरुवात) यांपासून तयार झालेला शब्द , ज्याचा अर्थ एखाद्या चांगल्या विषयाची सुरुवात, प्रारंभिक विधान.
'उप+संहार, संहार चा शब्दशः अर्थ ठार मारणे असा नसून शेवट करणे.
उपक्रम आणि उपसंहार ह्या दोन्ही मध्ये एकवाक्यता असावी. म्हणजे ज्या विषयाची सुरुवात केली आहे त्याला सुसंगत असाच शेवट असला पाहिजे. म्हणजे ज्या विषयाचा उहापोह करायचा आहे, फक्त त्याच विषयावर आख्यान करायचे.

**'अभ्यास'**
अभि'  जवळ, पुन्हा, च्या दिशेने. 'अस्' धातु म्हणजे असणे, राहणे, असणे.
 'अभ्यास' म्हणजे 'एखाद्या गोष्टीच्या जवळ जाणे', 'वारंवार करणे'.

एखाद्या गोष्टीत कुशलता मिळविण्यासाठी ते काम वारंवार करणे. मराठीत कच्चे मडके ठोकून ठोकून पक्के करणे असा शब्दप्रयोग आहे. छान्दोग्योपनिषदातील 'तत्वमसि' हे महावाक्य उद्दालक ऋषींनी आपला पुत्र आणि शिष्य श्वेतकेतु  यांस एकूण 9 वेळा सांगितले. श्रीभगवानकृष्णांनी अर्जुनास 'युद्ध कर ' असे सांगताना 18 अध्यायात एकूण 700 श्लोक सांगितले.

**अपूर्व**
 'अ' (नाही) आणि 'पूर्व' (आधीचे) मिळून 'अपूर्व' (आधी न झालेले) हा अर्थ तयार होतो. पूर्वी कधीही न पाहिलेले', 'अद्वितीय', 'अनोखे', किंवा 'असामान्य'
पुन्हा पुन्हा अभ्यास केल्यानंतर पूर्वी नसलेल्या ज्ञानाची अपूर्व प्राप्ती. ब्रह्मज्ञानाच्या बाबतीत अपूर्वता ही अपरिहार्य अवस्था असली तरी हि स्थिती एखाद्या संशोधकाच्या कामाला सुद्धा लागू पडेल.

**फल**
फल म्हणजे श्रवण प्रक्रियेचे प्रयोजन. फल' म्हणजे त्या शास्त्राच्या अभ्यासातून मिळणारा अंतिम लाभ किंवा अनुभव. आपल्या अध्ययनाचा, संशोधनाचा हेतू अपेक्षित फलप्राप्ती ने साध्य झाला पाहिजे.

**अर्थवाद**
भारतीय दर्शनशास्त्र नुसार अर्थवाद म्हणजे प्रशंसा, स्तुति, एखाद्या विषयाला धरून दिलेला दुजोरा, एखादी गोष्ट सिद्ध करण्यासाठी दिलेले प्रमाण.
न्याय दर्शन च्या अनुसार अर्थवाद चार प्रकारचे आहेत. स्तुति, निंदा, परकृति आणि पुराकल्प. स्तुती करताना एखादे उदाहरण द्यायचे जसे सूर्यासारखा तेजस्वी.

थोडक्यात मूळ विषयाला अनुसरून सुसंगत उदाहरणे देऊन त्या विषयाला अधोरेखित करायचे.

**उपपत्ति**

श्रवण प्रक्रियेतील शेवट चा टप्पा म्हणजे ह्या नंतर मनन ची प्रक्रिया सुरू होणार आहे. आपण जे ऐकले आहे त्या बद्दल आता आत्मविश्वास निर्माण झाला आहे आणि त्यावर मनन करायचे आहे.

प्रकरण प्रतिपाद्यार्थसाधने तत्र तत्र श्रूयमाणा युक्तिः उपपत्तिः।।


युक्ती म्हणजे तर्क किंवा हेतू. एखादा विषय समजून घेण्यासाठी सांगितलेले तर्क म्हणजे उपपत्ती. आपल्या रोजच्या व्यवहारातील दृष्टांत देऊन विषय समजावून सांगणे म्हणजे उपपत्ती.

एखादा विषय जर मुळापासून समजून घ्यायचा असेल तर आपणही साधारण वर दिलेल्या पद्धतींचा असाच अवलंब करत असतो. जे संशोधक आपला प्रबंध सादर करतात ते साधारण ह्याच पद्धतीने लिहितात . मंडळी, सहमत आहात का?

इति अनघा

**डॉ अनघा अनिल आठवले ९०४९१ ४४२२२**

...............................................



**श्रीरंग आठवले**

## रूपक कथा – साक्षात्कार (काल्पनिक)

**प्रसन्न आठवले**
**9049353809**

कोणे एके काळी, एका छोट्याशा खेडे गावात, मधू नावाचा, एक साधा गरीब पापभीरू मनुष्य होता. मोलमजुरी आणि गावातील सावकार, शेठ, सधन घरातून, मिळेल ते काम करून, आपलं आणि आपल्या कुटुंबाचं पोट भरायचा. गावात तसं वातावरण उत्तम असल्यामुळे, त्याला खायची प्यायची भ्रांत नव्हती. त्याशिवाय सणासुदीला, उत्तम नवीन कपडे, धान्य, फळफळावळ, अशीही सोय, गावातून आनंदाने केली जायची.

अनेक पिढ्या तिथेच राहिलेली सर्वच कुटुंबं, एकमेकांना धरून असायची. अडीअडचणीला कधीही कुणीही कोणाच्याही मदतीला धावून जायचं. तसा कोणताही गरीब, श्रीमंत असा कुठलाही भेदाभेद नसायचा. धार्मिक उत्सव, परंपरा इत्यादी बाराही महिने एकत्रितपणे पाळल्या आणि साजऱ्या केल्या जायच्या.

मधु, तसा धार्मिक वृत्तीचा होता. घरी देवांची पूजा करून मगच कार्याला बाहेर पडायचा. उरलेल्या वेळेत, देवाचं नाव घेत सर्व कामं करायचा. संध्याकाळी वेळेत घरी यायचा, भोजनोत्तर थोड्या गप्पाटप्पा करून, रात्री निवांत शांत झोपी जायचा. अशीच त्याची दिनचर्या असायची. पण सद्‌गुरू नसल्याची खंत त्याला नेहमी सतावत असे. त्यातच त्याचा, सर्वसामान्य माणसाप्रमाणे , वैचारिक गोंधळ व्हायचा. त्याच्या मनात सतत शंका येत असत. त्यामुळे नामस्मरण आणि देवाची प्रार्थना करताना कायम संभ्रम असायचा.

व्हायचं काय की, त्याच्या मनात शिवशंकर भगवान यांच्याबद्दल विशेष स्नेह होता. त्यांना तो आपलं आराध्य दैवत मानायचा. कुटुंबाचं कुलदैवत हेदेखील शंकर भगवान असल्यामुळे, त्याला कुलधर्माचा आधार सुद्धा होता. त्यामुळे

तो शिवांचा ॐ नमः शिवाय हा जप करत असे. पण ते करताना मन पुन्हा साशंक होत असे आणि वाटत असे की, आपण आपल्या आराध्याचं नाम घ्यावं की आपले आराध्य ज्या प्रभू श्रीराम यांचं नाम घेतात, ते रामनाम घ्यावं. या शंकेमुळे त्याचं करत असलेल्या नामात लक्ष लागत नसे.

या चित्त विचलित होण्याच्या साशंकतेमुळे, त्याला नाम घेतानाचा आनंद मिळेनासा झाला. त्याचा परिणाम त्याच्या मनावर आणि प्रकृतीवर व्हायला लागला. बरं तो अशा गावात रहात होता की, त्याच्या  जवळपास कोणी ज्ञानी, धर्मात्मा, सज्जन सदाचारी नसल्यामुळे, या शंकेचं समाधान किंवा निरसन करवून कसं घेणार, हासुद्धा प्रश्न पडत असे.

अश्याच व्यस्त दिनचर्येत, पण याच विचारांच्या नादात तो शेजारच्या एका गावात कामानिमित्त गेला. तिथे कामकाज झाल्यावर, मनाचा हा शीण घालवण्यासाठी जवळपास काही मंदिर आहे का अशी चौकशी करताना, त्याला कळलं की, गावात थोड्याच अंतरावर एक लहानसं राममंदिर आहे.

हे कळताच तो लगबगीने मंदिरात जाण्यासाठी निघाला. जवळपास फक्त न्याहारीचा डब्बा आणि कामासाठी आणलेलं गाठोडं होतं. ते घेऊन तो थोड्याच वेळात मंदिरापाशी पोहोचला. मंदिर परिसर खूप स्वच्छ होता. छोटं म्हटलं तरीही अडीच तीन गुंठा जागेत मंदिर विस्तार होता. त्याला छान भिंतीचं कुंपण घातलेलं होतं. सुंदर रंगकाम करून, भिंती आतून बाहेरून रंगवलेल्या होत्या.

आत चार पाच, आंबा, फणस, बेल, वड, जांभूळ अशी मोठी विस्तीर्ण आणि सुवासिक फुलांची सुद्धा झाडं होती. त्यामुळे परिसर सावलीने आच्छादित आणि सुवासिक फुलांनी हवेत गंध पसरलेला असा असायचा. त्याशिवाय मंदिरात येणाऱ्या भक्तांना, देवाच्या मूर्तीपुढे अर्पण करायला आणि हार बनवायला आपसुकच मंदिरातील फुलं उपयोगी पडत.

मंदिरात येणारे भक्तच परिसर स्वच्छ रहावा म्हणून आपणहून सेवा करायचे. त्यासाठी मंदिर परिसरात शिरल्यावर डावीकडे कोपऱ्यात झाडू आणि कचरा गोळा करायला लोखंडी धुळपाटी होती. एक दोन लोखंडी बादल्या होत्या. मंदिर परिसरात छोटीशी विहीर त्याला पोहऱ्या आणि त्याला एक बादली लावलेली होती. आलेले भक्त,  त्या विहिरीतून  पाणी काढून हात पाय, चेहरा स्वच्छ धुवून मगच दर्शनाला जात असत. मधु मंदिरात पोहोचला. शांत, स्वच्छ परिसर पाहून, श्रमाने दमलेल्या मधुला बरं वाटलं, हुशारी आली आणि शीण पण गेला. त्याने आपलं गाठोडं, गोपाळशेठ यांचं कामासाठी आणलेलं सामान, एका कोपऱ्यात सुरक्षित ठेवलं. नंतर मधुने विहिरीतून पाणी काढून हात पाय, चेहरा स्वच्छ धुवून श्रमाचा घाम घालवला आणि मंदिरात गेला. मुख्य गाभाऱ्यात आतमध्ये श्रीराम सीता, लक्ष्मण आणि पायाशी हनुमंत मूर्तीरूपात विराजित होते. सर्व मूर्ती काळया पाषाणातील होत्या. बाहेरच्या बाजूला श्रीगणेशमूर्ती उजवीकडे आणि भोलेनाथ यांची पिंडी, त्यासमोर नंदी हे डावीकडे स्थापित होते.

मधुने गजाननाचं दर्शन घेतलं. परिसरातील जास्वंदाचं रक्तवर्णी सुंदर ताजं फूल, मधुने खुडून घेतलं होतं, ते श्री गणेशाला अर्पण केलं. मनोभावे नमस्कार करून, भगवान शंकर यांच्या पिंडीजवळ छानशी मांडी घालून तो बसला.  विहिरीपाशी असलेल्या तांब्याच्या भांड्यात आणलेलं स्वच्छ शीतल जलाने, त्याने पिंडीवर अभिषेक केला. आपल्या आराध्याचं स्मरण करत शिवनामाची गर्जना केली. ॐ नमः शिवाय असा जाप काही काळ मोठ्याने करून, त्याने ध्यान लावलं. आणलेलं शुभ्र फुल आणि मंदिर परिसरात असलेल्या बेलाच्या झाडाची त्रिदली बेलपानं पिंडीवर वाहून, मनोभावे नमस्कार करून, मधु तिथून उठून श्रीरामापुढे उभा राहिला.

सुंदर सुबक श्रीराम मूर्ती.  त्यांच्या वाम अर्थात डाव्या बाजूला, श्रीरामांहून किंचित लहान उंचीची माता सीता यांची मूर्ती. प्रभूंच्या दक्षिण बाजूला श्रीराम यांच्याहून लहान उंचीची, भ्राता

लक्ष्मण यांची मूर्ती. लक्ष्मणच्या समोर एक मांडी दुमडून आणि एक मांडी उलगडून नमस्कार मुद्रेतील, श्रीरामांच्या चरणांवर दृष्टी स्थिर केलेला, श्रीराम भक्त हनुमंत बसला होता. मधुने हे सुंदर दृश्य आपल्या डोळ्यात साठवून घ्यायला सुरुवात केली. सर्व देवांना नमस्कार केला. श्रीराम व माता सीता यांच्या मूर्तीचं तेज अद्‌भुत भासत होतं. श्रीराम माता जानकी आणि लक्षण यांना विविध रंगांची फुलं वाहिली. हनुमंतासाठी रुईची खुडून आणलेली पानं आणि  फुलं वाहून, मनाप्रमाणे दर्शन, मधुने घेतलं.

शांत परिसर आणि मंदिरात कोणीहीं नाही, त्यामुळे मधुला तिथेच थोडा आराम करावासा वाटला. थोडा वेळ गेला आणि एक धिप्पाड काळा, रापलेल्या देहाचा उंचापुरा मनुष्य मंदिरात आला. तो आता आला, त्याने हातपाय चेहरा स्वच्छ धुतला. तडक श्रीराम यांच्या मूर्तीपुढे येऊन उभा राहिला. डोळे मिटून, उभ्या उभ्या त्याने ध्यान लावलं. श्रीराम माता सीता यांना भक्तिपूर्ण अंतःकरणाने त्याने नमस्कार केला. त्यानंतर त्याने मोठ्याने जय जय सीताराम आणि श्रीराम जयराम जय जयराम असा घोष त्याने केला. हा घोष त्याने बराच वेळ केला. त्याचा आवाज सुमधुर, भक्तिरसपूर्ण आणि अत्यंत सात्विक होता. ऐकणारा मंत्रमुग्ध होऊन जाईल असाच.

तो हे करत असताना, मधु त्याच्याकडे टक लावून पहात होता. त्याचं ते ध्यान अत्यंत देखणं होतं. खरतर तो आल्यापासून मंदिर परिसरात आणि विशेष करून, गाभाऱ्यात भस्माचा दरवळ येत होता. मधु त्या सुवासिक वातावरणात, भारला गेला. त्या प्रचंड देहाच्या पुरुषाच्या अंगातील शक्ती, त्याच्या वज्रबाहूतून स्पष्ट दिसत होती. अंगावर एक पांढरी शुभ्र पैरण आणि कमरेला शुभ्र धोतर अशा परिधानात, त्याची वज्रदेही शरीरसंपदा पाहून, कोणीतरी अंग मेहनत किंवा कुस्ती खेळणारा वीर किंवा राजाच्या सैन्यातील एखादा सैनिक वाटत होता.

त्याच्या ध्यानयुक्त चेहऱ्यावर अष्ट सात्विक भाव आणि त्याच्या भोवताली शुभ्र तेजोवलय देखील जाणवत होतं. काहीकाळ उभ्याने नामस्मरणाचा घोष केल्यावर तो एका दगडी बाकावर क्षणभर बसला. पुन्हा नमस्कार करुन, तसाच मागे मागे चालत, म्हणजे मूर्तीला पाठ न दाखवता निघून गेला. तो गेल्यावर, भानावर आलेल्या मधुचं लक्ष, त्याचा मागे जाताना उमटलेल्या हळदीयुक्त पावलांच्या ठसांवर गेलं. गाभाऱ्याच्या मुख्य द्वारापर्यंत ती पावलं ठळकपणे दिसत होती.

पण द्वाराच्या बाहेर, अस्पष्टसुद्धा खुणा नव्हत्या. मधुला पहिला धक्का तिथेच बसला. त्यानंतर त्याने उमटलेल्या प्रत्येक पावलावर पाहिलं, तेंव्हा त्याला त्रिशूळ, डमरू, नाग आणि वृषभ आकृती ठळकपणे कोरल्यासारख्या दिसल्या. हे पाहिल्यानंतर मधु कोसळला आणि त्या पावलावर आपलं शीश ठेवून ओक्साबोक्शी रडायला लागला.

कारण त्याला लक्षात आलं की, आलेली ती धिप्पाड देहाची व्यक्ती दुसरं तिसरं कोणीही नसून, त्याचे आराध्य दैवत, भगवान शंकर स्वतः होते. हे जाणवल्यामुळे आणि आपण त्यांना साधा नमस्कार सुद्धा केला नाही, या विचाराने व्याकुळ झाला. पण काही क्षणात तो भानावर आला आणि त्याच्या मनात दोन विचार विजेसारखे चमकून गेले.

एक म्हणजे आपल्याला निदान दर्शन झालं, झोप लागली नाही किंवा दृष्टी क्षीण झाली नाही. दुसरं त्याच्या दीर्घकालीन प्रश्नाचं उत्तर सुद्धा मिळालं. ज्या अर्थी आपले आराध्य श्रीरामाच्या दर्शनासाठी या एका साध्याशा मंदिरात येऊन, श्रीसिताराम आणि श्रीराम जयराम जय जयराम असा नामघोष करून गेले,त्याअर्थी त्यांनीच आपल्याला उत्तर पण दिलं. म्हणजे जर श्री शंकरांना सुद्धा रामनाम प्रिय आहे, तर आपण उगाच भलत्या शंका घेऊन, किती काळ वाया घालवत होतो.

म्हणजे आता प्रत्यक्ष आपल्या आराध्यांना संतुष्ट करण्यासाठी आपण श्रीरामनाम घेणे संयुक्तिक आणि श्रेयस्कर आहे. या विचाराने संतोष पावलेला मधू, आत्मसमानाधाने निजधामी परतला. पुढे पूर्ण एकाग्रतेने श्रीरामनाम घेत त्यांना आपल्या जन्माचं कल्याण करून घेतलं.

✏️ ©®कथाकल्पना आणि लेखन:


प्रसन्न आठवले
9049353809
9960762179


..................................................



**श्रीरंग आठवले**



**श्रीरंग आठवले**

## Flight Delay-Baggage Miss - A travel, Mosquito bite

**Dr. H Ajith Hebbar Atavale, Hosmata**

In all my years of international flying, I've collected a fair share of wild and unforgettable moments. It was back in March 2024, I just wrapped up my Tunisian (Northern Africa) trip and was flying back to India with my family via Tunis–Cairo (EgyptAir), Cairo–Mumbai (EgyptAir), Mumbai–Mangalore (Air India). The things seemed pretty normal until we realized that our Cairo bound flight from Tunis is going to be delayed by

an hour. "Don't worry, it's just a minor delay"' I told my wife, cappuccino in hand, as we made our way to the departure gate. In just 3 hours we landed in Cairo and were immediately told to run towards next boarding area. Mumbai bound Airbus was already waiting for us, the only Indians heading to Mumbai in the previous flight. No time for baggage checks, no X-rays—just a literal airport marathon from gate to gate with

handbags glued to our back. Breathless but relieved, we finally boarded the flight. Six calm hours later, homecoming felt real as we touched down in Mumbai at 4:00 AM.

Now here is a twist in the story. We proceeded to the baggage carousel, only to be told,

much to our dismay, that our luggage was still stuck in Cairo. Already exhausted from jet lag and the long journey, this news only added to our stress. The baggage assistance team then led us "missed baggage claim area" but through a bunch of formalities—lengthy form filling, passport and visa verification, boarding pass checks, and customs claims. Airliner staff with a calm posture said "no worry, you will get your baggage back in few days". Meanwhile, we were aware that our Mangalore-bound flight would be taking off soon, leaving us with very little time to spare. To add to our agony, finding the departure gate for our Mangalore flight turned out to be a herculean task, forcing us into yet another exhausting race across the terminal. Finally, a bus dropped us off near the Mangalore bound Air India plane. Now the story is reaching the climax…

The moment we boarded inside—a surprise struck !. Mosquitoes everywhere.
Passengers had already begun their "mosquito hunt," and I couldn't resist joining in.
One man joked, "I was the second to board this flight—after the mosquitoes did!".
Another asked the air hostess with a straight face, "Do you have a mosquito bat?" She laughed and said no. I told her, "In all my years of flying, this is the first time I've seen mosquitoes inside a plane. What's so special today?" With a helpless smile, she replied:
"Sir, this may be new for you, but it's routine for us. Our aircraft usually gets parked
overnight in a remote corner of Mumbai airport, which is a mosquito territory. They always board before the passengers do. What can I do?". Trying to console everyone, she assured us "Once we close the doors, we'll spray repellent, and the journey will be comfortable." Sure enough, the crew sprayed, but instead of vanishing the mosquitoes
simply shifted positions, from our arms to our legs. Eventually, we all gave up and accepted this unexpected "in-flight service." One passenger summed it up perfectly in a murmur: "What's the point in blaming the air hostess?"

Finally, a bumpy but safe landing in Mangalore brought relief. But the charm of seeing our homeland back again after a long trip was stolen, our luggage only reached us 7 days later but intact. We were thankful that, at the very least, the journey spared us from any mid-air turbulence. What a memorable journey it was - flight delay, baggage miss, and a mosquito bite served all in one ticket.

……………………………………………

# CHEMICAL, BIOLOGICAL, RADIOLOGICAL AND NUCLEAR (CBRN) THREATS TO SOCIETY – A HISTORICAL PERSPECTIVE

**Col (Dr) Ram Athavale**

Chemical, Biological, Radiological and Nuclear (CBRN) threats were earlier seen as Western or Developed nations' problems. In reality, CBRN threats are greater in developing countries due to various other pressing issues. In most developing nations, issues like poverty, lack of health infrastructure, conflict situations, unstable governments, lack of good educational facilities, ignorance of or inability to provide adequate safety measures and rampant corruption at all levels are issues that take precedence. While some countries are well aware of the CBRN risks and national vulnerabilities to these, situations in the country inhibit taking positive action towards risk mitigation. Some countries lack basic education on health, safety, and disaster management matters. Public health and personal hygiene are either ignored or not followed due to lack of funds, resources and institutional support.

The horrors of the Bhopal gas tragedy (1984), the LG Polymers Styrene gas leak at Vizag (2020), the SARS and Covid19 pandemics, the Chernobyl and Fukushima nuclear disasters, the countless industrial and logistic chemical accidents, and the tons of toxic wastes that abound in our cities are enough to raise public paranoia. A major CBRN incident occurring in a populated area can wreak havoc and result in multitude of casualties. See the effects of Covid19. Millions died. The whole world got a terrible scare and even today many countries are battling the scourge of the pandemic. Wave after wave had a devastating effect not just on the lives of people but on livelihood, business, and administrative capabilities.



**Chemical Industrial Accidents**

Today, CBRN materials and weapons have been adopted by terrorists organisations to enhance the hype, fear and number of casualties in their strikes. Just the mention of CBRN weapons or Weapons of Mass Destruction (WMD) leads to political paranoia and public chaos. From the 1995 Nerve agent attacks in Japan, poisoning of Russian spy with Polonium in 2006, extensive use of toxic chemical agents (mainly Chlorine and Sarin) in

Iraq and Syria in the last decade, Anthrax cases of 2014-16 in Europe and USA to the unforeseen Novichok agent cases of Salisbury and Amesbury in UK of 2018, CBRN terror has been showing its hydra heads world over.

New technologies like Genetics, Robotics, Artificial Intelligence, Nano Technologies, and Bio-Chem research are expanding and proliferating CBRN technologies to all. With such easy access of high tech to terrorists, who have acquired the necessary skills and expertise, the world has become a scary place to live in. However, our past generations have seen many CBRN calamities including deliberate use of CBRN materials as toxic weapons.

**Historical Use of CBRN Weapons**

Germ warfare has been known to mankind for ages. However, recent studies suggest that not only Germ warfare or Chemical weapons but even Atomic weapons were known and used by mankind in the ancient ages. In fact, India, being host to one of the oldest civilisations of the world, has documented evidence of the use of aircraft, missiles and Atomic weapons.

**Atomic War in Ancient India.** These verses from the Mahabharata (written in ancient Dravidian, then later in Sanskrit) describe horrific wars fought long before the recorder's lifetime. Consider these verses depicting an ancient battle from the Drona Parva, the seventh of eighteen books of the Indian epic Mahabharata:

*...(it was) a single projectile*
*Charged with all the power of the Universe.*
*An incandescent column of smoke and flame*
*As bright as the thousand suns*
*Rose in all its splendour.....it was an unknown weapon,*
*An iron thunderbolt, A gigantic messenger of death,*
*Which reduced to ashes the entire race of the Vrishnis and the Andhakas.*
*..The corpses were so burned as to be unrecognisable.*
*The hair and nails fell out ; Pottery broke without apparent cause,*
*And the birds turned white.*
*After a few hours all foodstuffs were infected......to escape from this fire*
*The soldiers threw themselves in streams to wash themselves and their equipment.*

In the way we traditionally view ancient history, it seems absolutely incredible that there was an atomic war approximately 5,000 years ago. And yet, of what else could the Mahabharata be speaking of? Until the bombing of Hiroshima and Nagasaki, modern mankind could not imagine any weapon as horrible and devastating as

those described in the ancient Indian texts. Yet they very accurately described the effects of an atomic explosion. Radioactive poisoning will make hair and nails fall out. Immersing oneself in water gives some symptomatic respite, though is not a cure.

Interestingly, the Manhattan Project chief scientist Dr J. Robert Oppenheimer (Father of the Atom Bomb) was known to be familiar with ancient Sanskrit literature. On witnessing the Trinity Test in 1945, he had reacted with a Sanskrit verse. Later, when asked in an interview conducted after he watched the first atomic test, he quoted from the Bhagavad Gita: *Now I am become Death, the Destroyer of Worlds.'*

Implausible as it may seem, some archaeologists claim to have found evidence in India and Pakistan, indicating that some cities were destroyed in atomic explosions. When excavations of Harappa and Mohenjo-Daro reached the street level, they discovered skeletons scattered about the cities, many holding hands and sprawling in the streets as if some instant, horrible doom had taken place. People were just lying, unburied, in the streets of the city. And these skeletons are thousands of years old, even by traditional archaeological standards. What could cause such a thing? Why did the bodies not decay or get eaten by wild animals? Furthermore, there is no apparent cause of a physically violent death.

The archaeologists also claim (a claim which is refuted and debunked by many of their peers) that these skeletons are among the most radioactive ever found, at par with those at Nagasaki and Hiroshima. At one site, Soviet scholars found a skeleton which had a radioactive level 50 times greater than normal. The Russian archaeologist A. Gorbovsky mentions the high incidence of radiation associated with these skeletons. Furthermore, thousands of fused lumps, christened "black stones", have been found at Mohenjo-Daro. These appear to be fragments of clay vessels that melted together in extreme heat. Counter theories claim that these are residue from kilns that were used to make clay pots by heating sand at high temperatures.

**Early modes of Chemical and Biological (CB) Warfare.** Ancient CB Warfare may go back to the earliest civilizations. History tells us of numerous uses of poisons and disease used as weapons in ancient wars in India, Greece, Rome, Western Europe and Middle East. Even our mythology tells us of the poisoning of Bhim with toxic *Laddoos*. Some documented examples are :-

(a) Arrows dipped in poison or putrefied organic material

(b) Poisoning of drinking water, food supplies

(c) Dropping diseased corpses in wells

(d) Catapulting of diseased carcasses into besieged cities

(e) Use of foul-smelling or toxic smokes

(f) Drawing of enemy forces into disease-ridden areas

(g) No differentiation between chemical and biological agents

*(h)* Earliest recorded references in India are from *Dhanurveda (4th millennium BC), Ramayana (±5000 BC) and Mahabharata (± 3000 BC)*

(i) References to venoms, hypnotic and lachrymatory agents

(j) Many references in Greek mythology to the use of toxicants; sanctioned by principal gods

(k) Gallic and Germanic tribes used toxicants in wars against Romans

CB warfare developed with the advancement of modern science. Before end 19th century, biological warfare as understood today was inconceivable. However, in the 18th century, it was realised that disease is caused due to the unhealthy condition of the body. Hence, inoculation and medicine gave advantage over enemy. By early 20th century, isolation and cultivation of bacterial diseases led to discovery of viruses. Experiments led to manipulation of disease-causing organisms on the cellular level.

**World War I.** The first incidents of modern biological warfare were seen in wars before the World War 1. The Hague Declaration of 1899 and the Hague Convention of 1907 forbade the use of "poison or poisoned weapons" in warfare, yet more than 124,000 tons of gases were produced by the end of World War I. The French were the first to use chemical weapons during the First World War, using the tear gases Ethyl Bromoacetate and Chloroacetone. They likely did not realize that effects might be more serious under wartime conditions than in riot control. It is also likely that their use of tear gas escalated to the use of poisonous gases. One of Germany's earliest uses of chemical weapons occurred on October 27, 1914, when shells containing the irritant Dianisidine Chlorosulfonate were fired at British troops near Neuve-Chapelle, France.

The first full-scale deployment of deadly chemical warfare agents during World War I was at the Second Battle of Ypres, on April 22, 1915, when the Germans attacked French, Canadian and Algerian troops with Chlorine gas. A total 50,965 tons of pulmonary,

lachrymatory, and vesicant agents were deployed by both sides of the conflict, including Chlorine, Phosgene, and Mustard Gas (Sulphur Mustard). Official figures declare about 1.3 million casualties directly caused by chemical warfare agents during the war. Chemical weapons were used by both sides in the First World War and by Italy against the Ethiopians in the 1930s.

**World War II.** World War II did not see extensive use of Chemical or Biological weapons in Europe. While both the Allies and Axis powers conducted large scale research programs on CB and Nuclear weapons, not much was effectively deployed on ground. Probably the catastrophic casualty figures from chemical warfare of the last war prevented them from doing so.

The story was different on the Eastern front. Beginning in the mid-1930s, Japan conducted numerous attempts to acquire and develop weapons of mass destruction. Following an international ban on germ warfare in 1925 by the Geneva Protocol, Japan reasoned that disease epidemics must make effective weapons. Japan developed new methods of biological warfare (BW) and used them on a large scale in China. During the Sino-Japanese War (1937–1945) and World War II, Unit 731 and other Special Research Units of the Imperial Japanese Army conducted human experimentation with Bio and Chemical toxic substances on thousands, mostly Chinese, Korean, Russian, American, and other nationalities as well as some Japanese criminals from the Japanese mainlands. In military campaigns, the Japanese army used biological weapons on Chinese soldiers and civilians. The 1943 Battle of Changde saw Japanese use of both bioweapons and chemical weapons against the Chinese.

Japan's infamous biological warfare Unit 731 was led by Lt. General Shirō Ishii. Unit 731 used plague-infected fleas and flies covered with cholera to infect the population in China. The Japanese military dispersed insects by spraying them from low-flying airplanes and dropping ceramic bombs they had developed that were filled with mixtures containing insects and diseases that could affect humans, animals, and crops. Localized and deadly epidemics resulted and an estimated 200,000 to 500,000 Chinese died of disease. Recent additional firsthand accounts testify the Japanese infected civilians through the distribution of plague-infested foodstuffs, such as dumplings and vegetables.

**The Atomic Bombs.** During the final stage of World War II, the United States detonated two nuclear weapons over the Japanese cities, with the consent of the United Kingdom, as required by the Quebec Agreement. On August 6, 1945, the United States

dropped an atomic bomb on the city of Hiroshima, Japan. Three days later, on August 9, 1945, the US dropped a second atomic bomb on Nagasaki. The two bombings killed 129,000–226,000 people, most of whom were civilians. These remain the only two instances of nuclear weapons being used in warfare to this day.

**Iran-Iraq War 1980-88.** The best documented recent use of chemical weapons is during the long Iran-Iraq War. Iraq employed Chlorine, Sarin Nerve gas and Mustard gas in vital segments of the front that killed 5,000. The singular attack at Halabja (The Halabja Massacre), Kurdistan, Iraq on 16 March 1988, when thousands of Kurds were killed by a large-scale Iraqi chemical attack. A UN and OPCW investigation confirmed use of Mustard gas and Sarin, a nerve agent. To date, the Halabja massacre remains the largest chemical weapons attack directed against a civilian-populated region in human history,[9] killing between 3,200 and 5,000 people and injuring 7,000 to 10,000 more.

**Syrian Conflict.** The use of chemical weapons in the Syrian Civil War has been confirmed by the United Nations. Deadly attacks during the war included the Ghouta attack in the suburbs of Damascus in August 2013 and the Khan al-Assal attack in the suburbs of Aleppo in March 2013. While no party took responsibility for the chemical attacks, the Syrian Ba'athist military was seen as the main suspect, due to a large arsenal of such weapons. A U.N. fact-finding mission and a UNHRC Commission of Inquiry have simultaneously investigated the attacks. The U.N. mission found the likely use of the nerve agent Sarin in the case of Khan al-Assal (19 March 2013), Saraqib (29 April 2013), Ghouta (21 August 2013), Jobar (24 August 2013) and Ashrafiyat Sahnaya (25 August 2013). The UNHRC commission later confirmed the use of Sarin in the Khan al-Asal, Saraqib and Ghouta attacks.




**Covid 19 is a Global Pandemic**



**Toxic waste dumping in open pits**

**Conclusion**

The world already has many diseases like Ebola, Marburg, Plague, SARS and its variants and many more. New viruses like Nipah, Corona, HIV,

Bird Flu are mutating fast and man is in a race to beat them. Chemical and nuclear material proliferation is widespread. Especially toxic chemicals are traded, stocked and processed in hundreds of tons daily across the world. We happily get such chemicals like pesticides, detergents and insecticides in our homes. We need to be extra vigilant and aware of these toxic threats in our midst.

**Col Ram Athavale, PhD**

**+91 9595062487**

……………………………………………

## २०२६ चे कुलसंमेलन

**आपले चौथे एकदिवसीय कुलसंमेलन २५ ऑक्टोबर २०२६ रोजी ठाणे येथील गोखले हॉल मध्ये घेण्याचे निश्चित केले आहे. अधिक तपशील वेळोवेळी आपल्याला पाठवूच. मोठ्या संख्येने आपल्या कुटुंबीयांसहित कुलसंमेलनात सामील व्हावे हे विनंती.**

**It has been decided that our fourth Kulsammelan would be conducted on 25th October 2026 at Gokhale Hall Thane, Maharashtra. More details would be sent to you soon. We request you to join this family get together in large numbers.**

……………………………………………

## पाकातली पुरी पाककृती

**सौ. उमा आठवले, पुणे.**
**98221 38317**



पाकातली पुरी पाककृती
साहित्य - एक वाटी बारीक रवा, एक वाटी मैदा, पाच चमचे दही, पाव चमचा मीठ, एक छोटा डावभर गरम केलेलं तेल, दोन वाट्या साखर, केशर किंवा खाण्याचा रंग, वेलचीपूड पाव चमचा , गरजेप्रमाणे दूध.
कृती - रवा, मैदा, मीठ, दही, गरम केलेलं तेल एकत्र करुन लागेल तसे दूध घालून पीठ भिजवावे. पीठ घट्ट भिजवून एक तास झाकून ठेवावे. नंतर पुऱ्या लाटून कराव्या. त्याच वेळी दुसरीकडे साखर बुडेल एवढं पाणी घालून साधा पाक करावा. साखर विरघळली की पाक बास होतो. त्या पाकात केशर किंवा रंग व वेलचीपूड घालावी. आवडत असल्यास लिंबाचा रस घालावा. पुरी तळून पाकात टाकावी. थोडा पाक मुरल्यावर पुऱ्या बाहेर काढाव्या.
हा एक पारंपारिक पदार्थ आहे. ह्या पुऱ्या खूप चविष्ट लागतात. रंगपंचमीला विशेष करुन या पाकातल्या पुऱ्या केल्या जातात.

सौ. उमा आठवले, पुणे.
9822138317

……………………………………………

## 'बल्लाळ सिद्धीविनायक"

**श्रीविजय श्रीपाद आठवले, ९८२२५ ६४४९४**



फेब्रुवारी २०२३ मध्ये नागांव येथे आपल्या "आठवले कुलसम्मेलनाची" सुरूवात खालच्या आळीतील 'बल्लाळ सिद्धीविनायकाची" पूजा करून झाली.

आपल्या २००७ साली प्रसिद्ध झालेल्या कुलवृत्तांतामधे ह्या देवळासंबंधी सविस्तर माहिती दिलेली आहे. वेदमूर्ती साने व रिसबूड ह्यांनी गणपतीची मूर्ती बडोदे संस्थानचे सरदार गोपाळराव मैराळ उर्फ बल्लाळ यांचेकडून मिळविली (कदाचित् त्यामुळेच बल्लाळ सिद्धीविनायक असे नामाधिमान झाले असावे). ह्या द्वयींनी ही मूर्ती बडोदे ते नांगाव हे ५०० मैलाचे अंतर पायी प्रवास करून आणली.

यादवराव आठवले ह्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या श्रीराम मंदिर असलेल्या वाडीत छोट्या पेंढारू जागेत सदर मुर्तीची स्थापना सन १८४७ चैत्र शुद्ध पंचमी ला करण्यात आली.

श्री महादेव जनार्दन आठवले ह्यांच्या पुढाकाराने सदर मंदिरात सन १८४७ पासून ज्येष्ठ शुध्द प्रतिपदा ते अष्टमी पर्यंत सात दिवस नाद-नाम सप्ताह सुरू झाला तो आजतागायत मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.
ह्या सात दिवसात मंदिरात २४ तास झांजांचा नाद सुरू असतो व तसा तो सूरु रहाण्यासाठी एकेका प्रहराची (तीन तास) जबाबदारी खालच्या आळीतील ४-५ घरांवर दिलेली असते. सप्ताह सुरू होण्यापूर्वी प्रहराप्रमाणे आडनावांची यादी मंदिरात लावली जाते. रोज रात्री २-३ तास हौशी मंडळी भजन करतात तसेच २-३ रात्री अलिबाग - चौल येथील मंडळेही भजनसेवा करायला येतात. अशा भजनानंतर कोकणातील खास चविचे दडपे पोहे केले जातात.
अलिकडच्या काळात दुपारी ३ ते ६ ह्या प्रहराची जबाबदारी महिला वर्गाने स्वेच्छेने स्विकारली आहे (करोनाकाळात १२ ते ३ ची जबाबदारी सुद्धा स्विकारली होती) महिलांचे स्वतंत्र भजनी मंडळ आहे. हीच मंडळी आजही अखेरच्या दिवशी अष्टमीच्या महाप्रसादाची तयारी करतात...... भाज्या चिरणे, लोणचे घालणे आणि खास पद्धतीने कच्च्या आंब्यांचे आंबवणी करणे इत्यादी.

ह्या सप्ताहाची सुरूवात प्रतीपदेला सकाळी षोडशोपचार पूजेने होते. मुर्तीवर हारतुरे दागिने फुले पितांबर...असा साज चढविला जातो. नंतर आळीकरांच्या भजनाने नाद-नाम सप्ताह सुरू होतो तो संपूर्ण २४×७ तास चालतो.

अष्टमीला सकाळी गळ्यात तुळशीमाळा घालून भजन करीत पायी फेरी काढली जाते. राम मंदिर, भिमेश्वर मंदिर, राम-मारूती मंदिर येथे दर्शन व आरत्या म्हणून मंडळी देवळात परत येतात व महाप्रसादाची वेळ होईपर्यंत भजन चालू रहाते. ह्यावेळी सर्वजण भजनात एवढे तल्लीन होतात की आटपा-आटपा असा धोशा लावावा लागतो.

सुरूवातीच्या काळात तीन वर्षे महाप्रसादाचा

खर्च श्री महादेव आठवले ह्यांनी केला. नंतर तो आळीकरांच्या सहभागातून होऊ लागला. शेती हाच तुटपुंजा आर्थिक स्त्रोत असल्याने आळीकर महाप्रसादासाठी तांदूळ, चाळीचे वाल, नारळ, अळू ह्यासारखे साहित्य देत असत. आता पोटापाण्यासाठी रहिवासी मुंबई पुण्यासारख्या ठिकाणी गेल्यानंतर परिस्थिती बदलली आहे. पक्वान्नसह सर्व खर्च देऊ इच्छीणाऱ्यांची यादीच संपत नाही आहे.

आताशा, महाप्रसादासाठी टेबल -खुर्च्यांची व्यवस्था केली जाते. ही टेबले मांडण्यापासून ते सर्व आवरल्यावर लादी धुण्यापर्यंतचे काम स्वयंसेवेने केले जाते. वाढप महिला वर्ग करीत असला तरी पक्वान्नाचा आग्रह करण्याचे काम पुरुषच करतात (कोण किती खाऊ शकतो ह्याचा त्यांना अनुभव असतो). एक वैशिष्ट्य म्हणजे कुणीही पानात अन्न टाकत नाही.

अष्टमीला रात्री एवढ्या दिवसांच्या जागरणाने त्रासलेल्या देवाला शेजारत्यांनी निजविण्याची व भक्त रक्षणासाठी क्षणात परत उठविण्याची प्रथा आहे. खालच्या आळीत राहून नंतर परगावी स्थायीक झालेल्या मंडळींना आणि माहेरवाशिणींना ह्या सप्ताहाची अतीव ओढ आहे. त्यामुळे किमान १-२ दिवस तरी ही मंडळी दर्शनाला येतात आणि मंदिराच्या खर्चाला देणग्या देवून हातभार लावतात.

देवळातील दुसरा मोठा उत्सव म्हणजे माघी चतुर्थीचा गणेश जन्म. आधी तो चार दिवस चालायचा. श्री गोविंदस्वामी आफळेंसारखे किर्तनकार बोलावले जायचे. पण नवीन पिढीची किर्तनातील रूची कमी झाल्याने फक्त चतुर्थीला गणेश जन्माचे किर्तन होते आणि विशेष म्हणजे हा जन्मोत्सव रात्री साजरा करतात.

देवळाच्या समाज मंदीरात, मंदीराशी संबंधित नसलेल्या दोन अनोख्या प्रथा कित्येक वर्षे सुरू आहेत. पहिली प्रथा - वटपौर्णिमेच्या रात्री 'भिजवलेल्या चणाडाळीला भरपूर तेलाची फोडणी देणे आणि शिजल्यावर नारळ गूळ घालून ती आंब्याच्या लोणच्याबरोबर खाणे. ही प्रथा त्या दिवशी वडावर पूजा सांगणाऱ्या ब्रह्मवृंदाने सुरू केली अशी ऐकीव माहिती आहे पण त्याचे प्रयोजन काय होते ते कळत नाही. एक मात्र नक्की की त्या डाळीची (भाजी म्हणा पाहिजेतर) चव अप्रतिम असते. लोणच्याची सुद्धा खासियत आहे. हे लोणचे मंदिरात ज्येष्ठ प्रतिपदा ते सप्तमी असे सात दिवस नाद-नाम सप्ताह चालतो. आठव्या दिवसाला महाप्रसाद असतो. ह्यसाठी लोणचे घातले जाते ते जरा जास्तच घालतात व एका छोट्या चिनी मातीच्या बरणीत भरून ठेवतात. बरीच वर्षे ही एकच बरणी वापरात आहे. ही डाळ सुद्धा सामुदायिक प्रयत्नाने बनवली जाते . कुणी नारळ खरवडतो, कुणी गूळ चिरतो कुणी पाणी आणतो इत्यादी. केळीची पाने मांडणे, वाढणे नंतरची आवराआवर हे करायला आता तरूणाई पुढे सरसावू लागली आहे. डाळ खाऊन झाली की सर्वांना गरमागरम पातीचहा दिला जातो.अजूनतरी ह्या कार्यक्रमाला पुरूषवर्गच जमतो. कार्यक्रम आटोपल्यानंतर खर्चाचा हिशोब करून त्याप्रमाणे वैयक्तिक वर्गणी गोळा केली जाते.

दुसरी प्रथा - कांदे नवमी. हा कार्यक्रम आषाढ नवमी पूर्वी सोयीचा दिवस बघून पण बहुतेक वेळा आषाढातील पहिल्या बुधवारी केला जातो हा कार्यक्रम सुद्धा पुरुषच डाळीच्या कार्यक्रमाप्रमाणे सर्वांच्या सहभागातून करतात. कालमानाप्रमाणे आता महिलावर्ग सुद्धा हा कार्यक्रम अन्य ठिकाणी करु लागला आहे.

..................................................

## चित्पावन आठवले वाचनालय

**स्वप्नील महादेव, 96192 18598**




आपल्या चित्पावन आठवले फाऊंडेशनच्या एका नविन उपक्रमाच, ठाण्यात उद्घाटन झालं *चित्पावन आठवले वाचनालय*

मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी चित्पावन आठवले फाऊंडेशन तर्फे, पुस्तकांच्या 5 Bags देण्यात आल्या.



एका बॅगेमध्ये 10-मराठी, 5-English आणि 15-हिंदी, पुस्तके आहेत. यात खाली दिलेल्या पुस्तकांचा समावेश आहे

1. लहान मुलांची गोष्टींची पुस्तके
2. साने गुरुजी, अब्दुल कलाम, सुधा मूर्ती अशा थोर माणसांची पुस्तके
3. Science, Drawing, Craft अशा Activity books
4. English story telling books
5. किशोर, साधना यांचे लहान मुलांसाठी असलेले अंक
6. ऐतिहासिक पुस्तके क्रांतिकारकांची पुस्तके
7. शास्त्रज्ञांची पुस्तके



*समर्थ भारत संचालित वस्ती विकास उपक्रमातील 5 वस्त्यांमधील मुलांना सतिश काका आणि विनायक काका यांच्या हस्ते या Bags, देण्यात आल्या*



……………………………………………

## सभासदांची विशेष कामगिरी - हार्दिक अभिनंदन

**1.Hearty Congratulations Dr Smita**
She received the prestigious GSI FELLOWSHIP by Geriatric Society of India. The fellowship is bestowed upon the selected members across India, who have done exceptional work in Geriatric (elderly people) Healthcare. This year, eight such candidates were selected & I am happy to share that, I may be the first Geriatric Prosthodontist to have received this fellowship. She is the only fellow from Maharashtra this year.
This honour has blessed her with more enthusiasm & power to work for our senior citizens population in India.
Dr. Smita Athavale
- Consultant Prosthodontist
Deenanath Mangeshkar Hospital & Research Centre, Pune
- Founder & Hon. Secretary
Association Of Geriatric Dentistry
AGeD



**2. डॉ शुभदा मोघे यांचे हार्दिक अभिनंदन**




9 डिसेंबर 2025 रोजी भरत नाट्य मंदिर पुणे येथे "स्वरानंद प्रतिष्ठान" तर्फे आयोजित " मंतरलेल्या चैत्रबनात" या कार्यक्रमाला या वर्षी तब्बल 50 वर्षे पूर्ण होत आहेत.त्या निमित्तच या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. 17 डिसेंबर 1975 रोजी कवी_गीतकार सुधीर मोघे यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या " मंतरलेल्या चैत्रबनात" या ग. दि. माडगूळकरांच्या गीतांच्या कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांनी भरभरून दाद दिली होती. 50 वर्षांनंतर ही श्रोत्यांचा तसाच प्रचंड प्रतिसाद मिळाला. 50 वर्षांपूर्वी स्वत: गदिमा, बाबूजी आणि राजा परांजपे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला होता.आत्ताचा कार्यक्रम सुवर्ण युगाच्या **या तीन मानकरी असलेल्यांच्या सुपुत्रांच्या** उपस्थितीत झाला. श्रीधर फडके यांनी 2 गीते सादर केली तर अन्य दोघांनी वडिलांच्या आठवणींत जागवल्या. जेष्ठ गायिका शैला दातार यांनी सावळा रंग तुझा..गीत सादर केलं. नामवंत गायक, गायिका आणि वादकांमुळे कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला.पराग माटेगांवकर यांनी संयोजन केलं आणि शुभदा सुधीर मोघे यांनी या कार्यक्रमाचे नेटके निवेदन केले.एकूणच हा कार्यक्रम रसिकांना स्मरणरंजन घेऊन गेला.

**डॉ शुभदा मोघे**

**3.सौ शैला मुकुंद (आठवले) यांचे हार्दिक अभिनंदन**

**चरित्रग्रंथ परिचय**

## पं जितेंद्र अभिषेकी: कला आणि जीवनप्रवास




हा चरित्रग्रंथ ' राजहंस ' या महाराष्ट्रातील मान्यवर प्रकाशन संस्थेनं प्रकाशित केला आहे. गेल्या वर्षी विद्यावाचस्पती श्री शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते या ग्रंथाचं प्रकाशन झालं होतं . शैला मुकुंद यांनी या ग्रंथाचं लेखन केलं आहे .

शिष्य ,मैफल गायक, संगीतकार आणि गुरु ही अभिषेकीबुवांची संगीत विश्वातील चार रूपं . त्याविषयी ग्रंथात सविस्तर लिहिलं आहे .याबरोबरच आधुनिक संगीत रंगभूमीचे युगकर्ता संगीतकार हीसुद्धा त्यांची ठळक ओळख आहे. म्हणून त्यांच्या सर्व सतरा नाटकांचे उल्लेख नाटकात केले आहेत. विशेष म्हणजे नाटककार ,कलावंत , चाली देतानाचा अनुभव, काही बंदिशींचा पदांसाठी केलेला चपखल उपयोग ---- अशी अधिकची माहिती वाचायला मिळते .

याखेरीज गोवा - मंगेशी ही बुवांची जन्मभूमी असल्यामुळे पोतुर्गीज राजवट, गोव्यातील देऊळ संस्कृती , नवाथे झाले अभिषेकी , मुंबई महानगर, आकाशवाणी , कोकणी भाषेची चळवळ ,बुवांचे गुरु,गोडसे परिवार अशा विषयांचा समावेश पृष्ट्यसंख्येच्या मर्यादेत लेखिकेनं केला आहे. परिचित अभिषेकीबुवांबरोबरच अपरिचित बुवा हे या ग्रंथाचं वैशिष्ट्य म्हणावं लागेल-कथालेखक, संस्कृत आणि इंग्रजी विषयांचे पदवीधर, कवितेचा आणी संतसाहित्याचा अभ्यास ,विविध विषयांचा व्यासंग, छंद, संघर्षकाळ - - - - उच्चविद्याविभूषित अशा बुवांच्या पत्नी विद्याताईही इथं गुरुमाऊलीच्या रुपात भेटतात. त्यांच्याविषयी एवढं सविस्तर बहुदा प्रथमच लिहिलं गेलं आहे.

या ग्रंथलेखनाला अनेकांच्या आठवणींचा आधार मिळाला आहे. याचा लेखिकेनं कृतज्ञतेनं उल्लेख केला आहे. विशेषतः अभिषेकी परिवार , बुवांचे शिष्य ,नातेवाईक, स्नेही आणि कलावंतांनी भरभरून आठवणी सांगितल्यामुळे बुवांच व्यक्तिमत्व वेगवेगळ्या दृष्टीकोनातून लेखिकेला लिहिता आलं.

सहजसुंदर भाषा , छायाचित्रं आणि अनेक संदर्भांमुळे हा चरित्रग्रंथ संगीतप्रेमींनी जरूर वाचावा असा आहे. ' राजहंस ' प्रकाशन संस्थेनं अतिशय दर्जेदार निर्मिती केली आहे.

शैला मुकुंद यांना या चरित्रग्रंथसाठी तीन पुरस्कार मिळाले आहेत. दैनिक लोकमत समुहाचा ' सर्वोत्तम लक्षवेधी ग्रंथ ' पुरस्कार माननीय मंत्री श्री उदय सामंत यांच्या हस्ते मिळाला. महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे श्रेष्ठता पुरस्कार तर डोंबिवली पै फ्रेंड्स लायब्ररीचा ' मधुश्री ' पुरस्कार मिळाल आहे.

### 4. Vinayak Laxman Athavale

**Congratulations!!!**

Vinayak participated in Jupiter *Half- marathon (21 km run)" and successfully completed the same in 2 hrs 36 mins. Jupiter Marathon, an initiative of Jupiter Hospital, Thane for noble cause, entered into 4th edition and this year the theme was Fight / race against Cancer



…………………………………………


## सभासदत्वासाठी आवाहन

**आपल्या सर्वांना आग्रहाची विनंति की संस्थेचे देणगीदार, हितचिंतक / वर्गणीदार व्हा. त्यासाठी**

वर्गणीदार/हितचिंतकास वार्षिक वर्गणी रु ५०० अथवा आजीव वर्गणीदार होण्यासाठी ची वर्गणी रु ७०००.

संस्थेच्या बॅंकेतील खात्याची माहिती HDFC Bank Ltd, F.C. Road branch, Pune, Current Account Number 50200056690683, IFSC Code HDFC0001115 ह्या खात्यात चेक/डीडी/रोख अथवा UPI / NEFT द्वारे पैसे भरून आपली माहिती गुगल अर्जाद्वारे पाठवावी. त्यासाठी लिंक खालीलप्रमाणे आहे
https://forms.gle/8xcrm1MkFY28XrsJ6
हा अर्ज आपल्याला सेलफोनवरून अथवा संगणकावरून भरता येईल.
सर्व आठवले परिवारांना विनम्र आवाहन करण्यात येते की आपण ठरविलेली उद्दिष्ट्ये आपल्या सर्वांच्या सक्रिय सहभागाशिवाय व आर्थिक पाठबळाशिवाय साध्य होऊ शकणार नाहीत म्हणून आपल्या आठवले परिवाराच्या सर्वांगीण उन्नतीसाठी मोठ्या संख्येने देणगीदार आणि वर्गणीदार / हितचिंतक व्हावे व संस्थेला आर्थिक पाठबळ द्यावे.

..................................................



**नाशिक**

## चांगल्या गोष्टी / बातम्या – २४.१२.२०२५

**कुमार आठवले, ९४२२००७५६२**
*चांगल्या गोष्टी / बातम्या* (५२)

नुकत्याच घडलेल्या व देशाच्या दृष्टीने चांगल्या, अशा खूप गोष्टी आहेत. पण त्यातील काही बातम्या खाली देत आहे. आपण यातील काही बातम्या कदाचित् वाचल्या असतील. तरी पण आपणासाठी परत एकदा पाठवत आहे.

१) ९ डिसेंबर रोजी "जगातील आय् टी क्षेत्रां"तील ३ मोठ्या कंपन्यांच्या प्रमुखांनी, एकापाठोपाठ एक अशी, आपले "पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी" यांची दिल्लीत भेट घेतली.*
*चर्चेअंती "मायक्रोसॉफ्ट चे सीईओ" श्री नाडेला यांनी सांगितले, की मायक्रोसॉफ्ट कंपनी अजून १७.५ बिलियन डॉलर ची गुंतवणूक, पुढील ४ वर्षात, भारतात करणार आहे. अगोदर जाहीर केलेल्या ३ बिलियन डॉलर सह "एकूण गुंतवणूक २०.५ बिलियन डॉलर" (१ लाख ८० हजार कोटी रुपये) असेल.*
*त्या पाठोपाठ "गुगलने" जाहीर केले की गुगल "१५ बिलियन डॉलर" ची गुंतवणूक येत्या ५ वर्षात भारतात करणार आहे.*
*त्यानंतर "ॲमेझॉन" ने सांगितले की ते २०३० पर्यंत "३५ बिलियन डॉलर" ची गुंतवणूक भारतात करतील.*

*ही सर्व गुंतवणूक "ए आय," "क्लाऊड", "डेटा सेंटर" वगैरे मध्ये असेल.*
*त्या पाठोपाठ कॉग्निजंट" आणि "इंटेल" च्या वरिष्ठांनी पंतप्रधानांची भेट घेऊन, ते ही भारतात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणार असल्याचे सांगितले.*
*"इंटेल"ने "टाटा इलेक्ट्रॉनिक्स" बरोबर करार केला असून "प्रगत सेमीकंडक्टर" चे उत्पादन भारतात केले जाणार आहे.*

२) दक्षिण कोरियातील मोठी "जहाज बांधणी" कंपनीने ( एच् डी ह्युंदाई ने ) ७ डिसेंबर रोजी जाहीर केले की त्यांनी तामिळनाडू सरकार

बरोबर "२०० कोटी डॉलर" (२,००० कोटी रुपये) गुंतवणूकीचा "जहाज बांधणी व जहाज दुरुस्ती"चा कारखाना उभा करायचा करार केला आहे. कोरिया बाहेर कंपनीचा हा पहिलाच कारखाना आहे. टप्प्याटप्प्याने कंपनी एकूण गुंतवणूक "२०,००० कोटी रुपयां"ची करणार आहेत* .
*या अगोदर जुलै मध्ये त्यांनी "कोचीन शिपयार्ड" कंपनी बरोबर तेथील जहाजांचे डिझाईन, व उत्पादन वाढविण्यासाठी करार केला.*
*तसेच सरकारी पब्लिक सेक्टर कंपनी "BEML" बरोबर बंदरावर वापरल्या जाणाऱ्या "मोठ्या क्रेन," भारतात बनवण्याचा करार केला.* *आतापर्यंत या सर्व क्रेन परदेशातून आयात केल्या जात होत्या.*

*केंद्र सरकारने २०४७ पर्यंत "जहाज बांधणी क्षेत्रात," "जगातील पहिल्या ५ देशात" भारताला आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यादृष्टीने हा करार महत्वाचा आहे.*

३) फेब्रुवारी २०२० मध्ये अमेरिकेच्या "लॉकहिड मार्टिन" कंपनी बरोबर "२४ हेलिकॉप्टर MH-60R" पुरवण्याच्या करार झाला होता. त्यापैकी २० हेलिकॉप्टर्स आतापर्यंत भारतीय नौदलाला मिळाली. ही जगातील "सर्वोत्तम लढाऊ हेलिकॉप्टर्स" आहेत.*
*डिसेंबरच्या सुरुवातीस भारत सरकारने या हेलिकॉप्टरच्या "मेंटेनन्स, पार्ट्स पुरवठा, इन्स्पेक्शन वगैरे" चा ५ वर्षांसाठीचा ७,९९५ कोटी रुपयांचा करार "लॉकहीड मार्टिन" कंपनी बरोबर केला. यामुळे या हेलिकॉप्टरची व अन्य देशांतीलही हेलिकॉप्टर्सची देखभाल, दुरुस्ती भारतात होईल. तसेच भारतातील कंपन्याना पुरवठा व सर्विस चे काम व तंत्रज्ञान मिळेल.*

४) २०४७ सालापर्यंत "१०० गिगॅवॉट आण्विक ऊर्जा" बनवण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने ठेवले आहे. त्या अनुषंगाने १८ डिसेंबर रोजी संसदेत "शांती बिल" मंजूर झाले* . *यामुळे "आण्विक ऊर्जा" निर्मितीसाठी खाजगी तसेच परदेशी उद्योजक या क्षेत्रात सहभागी होऊ शकतील. नवीन तंत्रज्ञान येईल.*

*भारताने कारखान्यात बनणाऱ्या मध्यम आकाराच्या अणुभट्ट्या विकसित केल्या आहेत. त्यामुळे अणुविद्युत प्रकल्प लवकर उभे होतील.*
*तसेच युरेनियम ऐवजी समुद्र किनाऱ्यावरील वाळूतील थोरियम पासून "युरेनियम २३३" मिळवून त्यावर चालणाऱ्या अणुभट्ट्या बनवण्याची तयारी केली जात आहे. कारण आपल्याकडे फारसे युरेनियम उपलब्ध नाही. पण थोरियमचा साठा मात्र जगात असणाऱ्या एकूण थोरियम च्या २५% टक्के साठा आपल्याकडे आहे.* *तामिळनाडूतील कल्पकम् येथे "भवानी प्रकल्पा"अंतर्गत ५०० मेगॅवॉटच्या २ अणुभट्ट्या, ज्या थोरियम पासून "युरेनियम २३३" बनवून त्यावर चालतील, अशा उभ्या केल्या जात आहेत.*

५) १५ डिसेंबर रोजी "C-Dac" ने बनवलेल्या "१.० GHz ६४ बिट- ड्युअल कोअर" मायक्रोप्रोसेसर "ध्रुव ६४" चे उद्घाटन झाले. भारतामध्ये मायक्रोप्रोसेसर चे मोठे मार्केट आहे. व जगात बनवलेल्या एकूण मायक्रोप्रोसेसर पैकी जवळपास २५% मायक्रोप्रोसेसर हे भारतात वापरले जातात. आजवर हे मायक्रोप्रोसेसर आयात केले जात होते.*
*मायक्रोप्रोसेसर हे सध्याच्या आधुनिक इलेक्ट्रॉनिक डिव्हाईसेसचा (जसे मोबाईल, कॉम्प्युटर, सॅटलाईटस्, संरक्षण सामुग्री वगैरे) मेंदू समजला जातो.*

*सी-डॅक हे यापुढील प्रगत मायक्रोप्रोसेसर "धनुष्य" व "धनुष्य+" बनवत आहेत. त्यामुळे भारत हा आपल्या गरजेसाठी तसेच जगाला पुरवण्यासाठी मायक्रोप्रोसेसर निर्मितीत सज्ज होत आहे.*

६) मोहोली (पंजाब) येथे सरकारी पब्लिक सेक्टर मधील एकमेव कंपनी "सेमी कण्डक्टर लॅबोरेटरी" ही "४,५०० कोटी" गुंतवणूक करुन

उभी केली जात आहे. येथे "वेफर फॅब्रिकेशन प्लांट" उभारला जाणार असून "चिप बनवण्यात" ही कंपनी अग्रेसर राहील.*
*येथील प्रकल्प उभारणीच्या कामासाठी नुकत्याच तीन कंपन्या निवडल्या गेल्या आहेत. ज्या मध्ये "टाटा सेमिकंडक्टर" चा मोठा वाटा (५० ते ५५%) आहे. "८ इंच वेफर चिप फॅब्रिकेशन प्लांट" ची उभारणी त्यांच्या कडे असेल* .

*दुसरे पॅकेज हैद्राबाद येथील "Cyient" या कंपनीला, तर तिसरे सिंगापूर येथील "अप्लाइड मेटल्स" ला मिळाले*.

*पुढील ३० महिन्यात हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहे.*

७) १० डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या "युनेस्को" च्या आंतरसरकारी समितीच्या "२० व्या अधिवेशनात", भारतीय प्रकाशोत्सव असलेल्या "दीपावली (दिवाळी)" ला "युनेस्कोच्या मानवतेच्या अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या यादीत" समाविष्ट करण्यातआले. "सामाजिक एकता" मजबूत करणारी आणि "उदारता" आणि "आशा" यासारख्या मूल्यांना प्रोत्साहन देणारी, एक जिवंत परंपरा म्हणून "दीपावली" ला मान्यता देण्यात आली. यामध्ये कुटुंबे, कारागिर आणि जगात भारताबाहेर असलेल्या भारतीय लोकांच्या पाठिंब्याचा, व "हस्तकला," "विधी" आणि "सामुदायिक कार्यक्रमांचा" समावेश आहे.*

८) २७ ऑगस्ट रोजी अमेरिकेने भारतीय मालावर "५०% आयात कर" लावला. त्यामुळे पहिले दोन महिने भारताच्या अमेरिकेतील निर्यातीवर परिणाम झाला. पण नोव्हेंबर २५ मध्ये मात्र भारताची "अमेरिकेला होणारी निर्यात" नोव्हेंबर २४ च्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर म्हणजे "२२.६१% वाढली" व निर्यात ६.९८ बिलियन डॉलर झाली. तसेच एप्रिल ते नोव्हेंबर या ८ महिन्यातील निर्यातही मागील वर्षी पेक्षा ११.३८% वाढून एकूण ५९.०४ बिलियन डॉलर (५,३४,६०० कोटी रुपये) झाली* .
*इंजिनिअरिंग सामानाची निर्यातही नोव्हेंबर २५ मध्ये मागील वर्षी पेक्षा ७६.११% वाढून ३३०.६२ मिलियन डॉलर झाली.*

*अमेरिकेप्रमाणे चीनला होणारी निर्यातही नोव्हेंबर २४ च्या तुलनेत नोव्हेंबर २५ मध्ये ९८.१२% वाढून २.२ बिलियन डॉलर झाली. तर एप्रिल ते नोव्हेंबर पर्यंत ची निर्यात ही ३२.८३% वाढून १२.२२ बिलियन डॉलर झाली. ही वाढ विशेष करून इंजिनिअरिंग व इलेक्ट्रॉनिक सामानांच्या निर्यातीत झाली.*

*याचबरोबर नोव्हेंबर २५ मध्ये सोने, तेल व कोळसा याची आयात कमी झाली. त्यामुळे नोव्हेंबर २५ मधील इंजिनिअरिंग सामानाच्या आयात व निर्यात यातील तूट गेल्या ५ महिन्यात सर्वात कमी (म्हणजे २४.५३ बिलियन डॉलर) झाली.*
*नोव्हेंबर २५ मध्ये "सर्व्हिसेस ची निर्यात" ३५.८६ बिलियन डॉलर झाली. तर आयात १७.९६ बिलियन डॉलर झाली. त्यामुळे निर्यात ही आयातीपेक्षा १७.९ बिलियन डॉलरने (१,६१,१०० कोटी रुपयांनी) जास्त झाली.*

९) सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी निवडून आलेले आपले मा. "नरेंद्रजी मोदी" हे "जगातील सर्वात लोकप्रिय व्यक्ती" ठरले आहेत. गेल्या ११ वर्षात त्यांना "२९ देशांनी" त्यांच्या देशातील सर्वोत्कृष्ट बहुमान देऊन त्यांचा सत्कार केला आहे.*
*२०१४ साली पंतप्रधान झाल्यावर त्यांना २०१६ मध्ये २, २०१८ मध्ये २, तर २०१९-४, २०२१-१, २०२३-६, २०२४-४ आणि २०२५ मध्ये आतापर्यंत १० देशांकडून त्या देशांचे सर्वोच्च सन्मान मिळाले आहेत.*

*आतापर्यंत जगात कोणत्याही देशाच्या पंतप्रधानांना इतके सन्मान मिळालेले नाहीत.*

*कुमार आठवले.*
९४२२००७५६२
.............................................